www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

दैनिक
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ | ■ वर्ष - ०२ ■ अंक २२ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, रविवार, २६ मे २०२४ | ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात

### शीव रुग्णालयात भरधाव कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू

● मुंबई, विशाल पाटील :

शीव येथील मुंबई महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक महापालिका सामान्य रुग्णालयाच्या आवारात शुक्रवारी रात्री भरधाव वेगात आलेल्या मोटारगाडीने एका वृद्ध महिलेला धडक दिली. या अपघातात महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती पोलिसंनी दिली.

शीव पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, लोकमान्य टिळक महापालिका सामान्य रुग्णालयाच्या आवारात शुक्रवारी रात्री एक डॉक्टर भरधाव वेगात गाडी चालवत होता. त्यावेळी त्याने वृद्ध महिलेला धडक दिली. या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू झाला. मृत्यू झालेल्या महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही. याप्रकरणी प्राथमिक तपास अहवाल नोंदवून तपासाला सुरुवात करण्यात आली आहे. मात्र अद्याप डॉक्टरला अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्याने दिली.

### रत्नागिरी नगर परिषदेतर्फे ५० खाटांचे रुग्णालय सुरू करणार, पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली माहिती



● रत्नागिरी, दिगंबर जाधव:

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून जसे मुंबई आणि ठाणे येथे रुग्णालये सुरू झाली आहेत त्याच धर्तीवर रत्नागिरी नगर परिषदेतर्फे ५० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे. या रुग्णालयामध्ये केवळ एका केसपेपरच्या आधारावर तपासणी केली जाणार आहे, अशी माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली.

राज्यातील लोकसभा निवडणुकीनंतर प्रथमच जिल्ह्यात आलेल्या सामंत यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ते म्हणाले की, ७७ कोटी रुपये मंजूर असलेल्या जिल्हा परिषदेच्या नूतन इमारतीचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून, येत्या दोन महिन्यांत इमारत पूर्ण होईल. जिल्हाधिकारी कार्यालयातील १०० कोटींच्या प्रशासकीय इमारतीचे काम प्रगतिपथावर आहे.नगर परिषदेची नूतन इमारत अंतिम टप्प्यात आहे, तर रत्नागिरी पंचायत समितीचे नूतन इमारतीचे काम ९० टक्के झाले असून, लवकरच ही इमारत पूर्ण होईल.

पान २ वर

# राज्यातील ७४३ शेतकऱ्यांमध्ये 'सलोखा'

## मुद्रांक, नोंदणी शुल्कात ६.६० कोटींची माफी



● पुणे, अभिजित येरल्लू :

शेतजमिनीचा ताबा, वहिवाटीबाबत शेतकऱ्यांमधील आपसातील वाद मिटविण्यासाठी शासनाने सलोखा योजना आणली आहे. एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे, दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीन धारकांचे दस्तांच्या अदलाबदलीसाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्कात सवलत देण्यात आली आहे. त्यानुसार आतापर्यंत ७४३ दस्त नोंद झाले असून, तब्बल ६.६० कोटी रुपयांचे मुद्रांक आणि नोंदणी शुल्कात सवलत देण्यात आली आहे.

महाराष्ट्रामध्ये किंबहुना देशामध्ये जमिनीच्या वादाबाबतची कोट्यवधी प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्यामध्ये मुख्यतः मालकी हक्क, शेताचा बांध, जमिनीचा ताबा, रस्ता, शेतजमीन मोजणी, अधिकार अभिलेखातील चुकीच्या नोंदी, शेतीवरील अतिक्रमण, शेत वहिवाट, भावा-भावांतील वाटणी, शासकीय योजनेतील त्रुटी किंवा प्रस्ताव अमान्यता आदी कारणांमुळे शेतजमिनीचे वाद आहेत. हे वाद अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे असल्याने ते वर्षानुवर्षे चालू राहतात. या सर्व पार्श्वभूमीवर वाद संपुष्टात येण्यासाठी शासनाने सलोखा योजना सुरू केली आहे.

शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे किमान १२ वर्षांपासून असला पाहिजे, अकृषिक, रहिवासी, तसेच वाणिज्यिक वापराच्या जमिनींसाठी ही योजना लागू नाही, दोन्ही पक्षकारांनी सर्वसंमतीने हा अदलाबदल दस्त नोंदवीत आहे, अशा प्रकारची अट दस्तामध्ये असणे आवश्यक, वस्तुस्थितीदर्शक पंचनामा मंडल अधिकारी आणि तलाठी यांनी नोंदवून घेत पंचनामा प्रमाणपत्र शेतकऱ्यांना दिले जात आहे, पंचनामा प्रमाणपत्र अदलाबदल दस्तास जोडणे आवश्यक अशा अटी योजनेत आहेत, अशी माहिती सह नोंदणी महानिरीक्षक नंदकुमार काटकर यांनी दिली.

# "मग गुजरातमध्ये मुस्लिमांना आरक्षण का दिलं?" तेजस्वी यादवांचा नरेंद्र मोदींवर पलटवार

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बिहार दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय जनता दलावर जोरदार निशाणा साधला. पंतप्रधान मोदींनी एनडीएचे उमेदवार उपेंद्र कुशवाह यांच्या समर्थनार्थ करकटमध्ये सभा घेतली. यावेळी त्यांनी बिहारमधील गरिबांना लुटणारा राजा किंवा राजपुत्र कितीही मोठा असला तरी त्याला तुरुंगात जाऊन तुरुंगाची भाकरी खावीच लागेल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. ही एनडीए सरकार आणि मोदींची हमी आहे, असंही पंतप्रधान मोदी म्हणाले. यावर आता तेजस्वी यादव यांनी मोदींना प्रत्युत्तर दिलं.

पान २ वर

### जिल्हाधिकाऱ्यांचा मोठा निर्णय

# चक्क उन्हामुळे 144 कलम लागू, नागरिकांना आवाहन

● जळगाव, सचिन कदम:



राज्यात उष्णतेचा पारा चांगलाच वाढला असून विदर्भासह खान्देशात तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत आहे. जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक तापमान असल्याची माहिती असून उष्णतेमुळे मुक्ताईनगर तालुक्यातील गावात 100 पेक्षा जास्त शेळ्या दगावल्याची घटना घडली आहे. त्यामुळे, उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी आता प्रशासनही सज्ज झालं आहे. जिल्ह्यात पसरलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांना कोणत्याही प्रकारे त्रास होऊ नये, तसेच उन्हात काम करण्याची वेळ कुठल्याही कामगारांवर येऊ नये, म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. मात्र, या निर्णयाच्या अनुषंगाने सविस्तर स्पष्टीकरणही देण्यात आले आहे.

जिल्ह्यातील कुठल्याही संस्थेने किंवा फर्मने आपल्या कामगारांना उन्हात काम करण्यास बाध्य करू नये, यासाठी जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये 144 कलमान्वये आदेश पारित करण्यात आला आहेत.

पान २ वर

# स्वच्छता मोहिमेतून शनिवारी १३० मेट्रिक टन राडारोडा गोळा

## एकूण ३० मेट्रिक टन टाकाऊ मोठ्या वस्तू व ७९ मेट्रिक टन कचरा जमा

● मुंबई, विशाल कारंडे :



मुंबई : महानगरपालिकेच्या सर्व प्रशासकीय विभागातील विविध ठिकाणी शनिवारी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान १३० मेट्रिक टन राडारोडा (डेब्रीज), ३० मेट्रिक टन टाकाऊ मोठ्या वस्तू आणि ७९ मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. तसेच, ३३६ किलोमीटर लांबीचे रस्तेही स्वच्छ करण्यात आले.

मुंबई गेल्या २७ आठवड्यांपासून सखोल स्वच्छता मोहीम सुरू आहे. या मोहिमेला व्यापक स्वरूप देत प्रत्येक शनिवारी पालिकेच्या सर्व प्रशासकीय विभागात नियमितपणे स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत शनिवारी सर्व प्रशासकीय विभागात (वॉर्ड) लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यात १३० मेट्रिक टन राडारोडा, ३० मेट्रिक टन टाकाऊ मोठ्या वस्तू आणि ७९ मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. तसेच, सुमारे ३३६ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवर ब्रशिंग करून धूळ काढण्यात आली.

एकूण १ हजार ५४३ कामगार – कर्मचाऱ्यांसह जेसीबी, डंपर, कॉम्पॅक्टर, कचरा संकलन करणारी वाहने, पाण्याचे टँकर अशी विविध वाहने आणि फायरेक्स यंत्र, मिस्टींग यंत्र आणि अन्य अद्ययावत यंत्रणांच्या साहाय्याने ही कामगिरी करण्यात आली. पी दक्षिण विभागात कृष्णवाटिका मंदिर परिसर, टी विभागात मुलुंड पश्चिम येथील डॉ. आर. आर. मार्ग, आर दक्षिण विभागात कांदिवली (पश्चिम) येथे मिलाफ सिनेमागृह परिसर, स्वामी विवेकानंद मार्ग, एम पूर्व विभागात वामन तुकाराम पाटील मार्ग, के पश्चिम विभागात व्ही. एम. मार्ग.

पान २ वर

# अहेरीवरुन अमरावतीकडे जाणाऱ्या बसचा भीषण अपघात; 27 प्रवासी घेऊन जाणारी बस पलटली



● गडचिरोली, नितीन देवळेकर:

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी आगारातून अमरावतीच्या दिशेनं जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात बसचालकासह दोन महिला गंभीर जखमी झाल्याची माहिती हाती आली आहे. आलापल्ली ते आष्टी मार्गावरील धंनूर फाट्याजवळ ही घटना आज दुपारच्या सुमारास घडलीय. धंनूर फाट्यावरील वनविभागाच्या नाक्याजवळ समोरून येत असलेल्या वाहनाला साईड देण्याच्या दरम्यान बाजूला खोल भाग असल्याचा अंदाज बस चालकाला न आल्याने बस अचानक पलटली.

पान २ वर

# डोंबिवली कंपनी स्फोटातील आरोपीला पोलीस कोठडी

● ठाणे, यश सावंत :

डोंबिवली एमआयडीसीतील सोनारपाडा येथील अमुदान कंपनी स्फोटातील मुख्य आरोपी मलया मेहता याना कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायधीश ए. के. पठाण यांनी शनिवारी चार दिवसांची (२९ मे) पोलीस कोठडी सुनावली. यावेळी न्यायालयात सरकार पक्ष, कंपनीचे वकील, सामाजिक हक्क संस्थेच्या प्रतिनिधींनी न्यायालयासमोर बाजू मांडली.

अमुदान कंपनीचे मलया प्रदीप मेहता (३८), त्याची आई मालती प्रदीप मेहता हे मालक आहेत. मालक मलया हे शुक्रवारी न्यायालयात अटकपूर्व जामीन घेण्यासाठी आले असताना ठाणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्यांना अटक केली होती. त्याचवेळी नाशिक येथे असलेल्या त्यांच्या आईला चौकशीसाठी गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे.



मलया मेहता यांना अटकेनंतर शनिवारी दुपारी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात मानपाडा आणि गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयात सरकार पक्षातर्फे आरोपी मलया मेहता यांना चौदा दिवसांची पोलीस कोठडी देण्याची मागणी करण्यात आली. त्याला कंपनीच्या वकिलांनी हरकत घेऊन कंपनीतील उत्पादन प्रक्रियेशी निगडित रासायनिक घटक, बॉयलर आदींच्या रितसर परवानग्या घेऊनच उत्पादन प्रक्रिया केली जात होती. दुर्घटना घडण्यापूर्वी मालक मलया मेहता हे पाऊण तासाच्या कालावधीत अमुदान कंपनीच्या दिशेने पोहचणार होते, पण तत्पूर्वीच कंपनीत स्फोट झाला. त्यामुळे कमीत कमी कोठडी देण्याची मागणी कंपनीच्या वकिलांनी न्यायालयात केली. सरकार पक्षाने या मागणीला हरकत घेत कंपनीने उत्पादन प्रक्रियेशी निगडित सर्व परवानग्या घेतल्या होते. हे खरे असले तरी प्रत्यक्ष उत्पादन सुरू असताना त्याची काळजी, काटेकोर अंमलबजावणी केली जात होती का. त्याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. या सर्व प्रकरणाचा पोलिसांना कंपनी स्थळी जाऊन तपास करायचा आहे. त्यामुळे चौदा दिवसांची कोठडी महत्वाची आहे, असे सरकार पक्षातर्फे सांगण्यात आले.

पान २ वर

### दहा जण बेपत्ता

■ अमुदान कंपनी स्फोट प्रकरणात अमुदान कंपनीसह सप्तवर्ण, कॉसमॉस कंपनीतील एकूण १० जण बेपत्ता आहेत. या बेपत्ता कामगारांचे नातेवाईक मानपाडा पोलीस ठाणे, शास्त्रीनगर रुग्णालय, कंपनी परिसरात जाऊन शोध घेण्याची मागणी करत आहेत. बचाव कार्यात सापडलेले सहा मृतदेह ओळखण्याच्या पलीकडे आहेत. त्यामध्ये या कामगारांचा समावेश असण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. मृतदेह आणि त्यांच्या नातेवाईकांच्या फोरेन्सिक, डीएनए चाचण्या केल्यातर जळीत मृतदेह कोणत्या कुटुंबातील आहेत ते स्पष्ट होणार आहे. त्या प्रक्रिया आता सुरू करण्यात आल्या आहेत, असे एका तपास अधिकाऱ्याने सांगितले. आपल्या कुटुंबातील सदस्य बेपत्ता असल्याने कुटुंबीयांमध्ये अस्वस्थता आहे.

# राज्यात उष्माघाताचे रुग्ण २५० पार

● नवी मुंबई, भावना जैन :



राज्यामध्ये वाढत्या तापमानामुळे उष्माघाताच्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. मागील अडीच महिन्यांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांची संख्या २५० पार गेली आहे. सर्वाधिक रुग्णांची नोंद जालना, नाशिक, बुलढाणा आणि धुळे या जिल्ह्यांमध्ये झाली आहे.

राज्यामध्ये मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांमध्ये वाढत्या तापमानामुळे उष्णतेची लाट आली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त आहे. त्यातच देशातील उत्तरेकडील राज्यामध्ये हवामान खात्याने अलर्ट जारी केला आहे. दिल्लीमध्ये उष्णतेचा पारा ५० अंश सेल्सिअसच्या आसपास जाण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना उष्माघाताचा त्रास होण्याचे प्रमाण वाढत आहे.

मार्च, एप्रिल आणि २० मेपर्यंत राज्यभरात उष्माघाताचे तब्बल २५१ रुग्ण आढळले आहेत. राज्यामध्ये एप्रिलच्या अखेरपर्यंत नाशिक व बुलढाण्यामध्ये उष्माघाताच्या रुग्णांची संख्या अधिक होती. मात्र मे महिन्यामध्ये जालना जिल्ह्यात रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. जालना व नाशिकमध्ये सर्वाधिक २८ रुग्ण सापडले आहेत. त्याखालोखाल बुलढाणा २२, धुळे २०, सोलापूर १८, परभणी १२ रुग्ण आढळले आहेत. तसेच लातूर, मुंबई आणि नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये उष्माघाताचा एकही रुग्ण आढळलेला नाही.


### एप्रिलमध्ये सर्वाधिक रुग्ण आढळले

राज्यात १ मार्चपासून २० मेपर्यंत उष्माघाताचे २५१ रुग्ण आढळले आहेत. यापैकी मार्चमध्ये ४०, एप्रिलमध्ये १६०, तर २० मे पर्यंत ५१ रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे एप्रिलमध्ये उष्माघाताचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळल्याचे निदर्शनास आले आहे.

- जालना – २८
- नाशिक – २८
- बुलढाणा – २२
- धुळे – २०
- सोलापूर – १८
- परभणी – १२
- नागपूर – ११
- उस्मानाबाद – १०
- सिंधुदुर्ग – १०

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आढळले १६ सस्तन प्राणी

## ११ वन्य पक्षी, परिसपृ प्रजाती



● सांगली, विशाल पाटील :

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात बौध्द पौर्णिमेला पाणवठ्यावरील ८१ मचानावर केलेल्या गणनेमध्ये १६ प्रकारचे सस्तन वन्य प्राणी व ११ प्रकारचे वन्य पक्षी, परीसपृ प्रजातीचे २०० वन्यप्राण्यांचे दर्शन झाल्याची नोंद निसर्गप्रेमींनी केली. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील पाटण, कोयना, बामणोली, कांदाट, चांदोली, ढेबेवाडी, हेळवाक आणि आंबा या वन परिक्षेत्रांतील जंगलातील ८१ मचानावर बसून अरण्यवाचनाचा थरारक अनुभव घेण्याची संधी निसर्ग प्रेमींना मिळाली. ढगाळ वातावरण, दाट धुके व पाऊस असूनसुद्धा अपुऱ्या प्रकाशात पार पडलेल्या या गणनेत बिबट्यासह एकूण १६ सस्तन वन्य प्राणी प्रजातींचे तसेच ११ वन्य पक्षी, परीसृप प्रजातींचे दर्शन निसर्गप्रेमींना घडले आहे.

निसर्गानुभव कार्यक्रम २०२४ मध्ये सहभागी होण्यासाठी सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी याबरोबरच नगर, पुणे, मुंबई येथूनही निसर्गप्रेमींनी हजेरी लावली होती. त्यांच्याकडून भरून घेण्यासाठी प्रपत्र देण्यात आले होते. यानुसार २०० हून अधिक वन्यप्राण्यांची नोंद झाली आहे. ऑनलाईन नोंदणी केलेल्या निसर्ग प्रेमींना रात्री पाणवठ्यावर जलपाणासाठी आलेल्या वन्य प्राण्यांची नोंद प्रपत्रावर करण्यास सांगण्यात आले होते.

पान २ वर

## संपादकीय

# घातपात ?

इराणचे अध्यक्ष इब्राहिम रईसी यांचे हेलिकॉप्टर अपघातात निधन झाल्याची अधिकृत घोषणा त्या देशाच्या सरकारकडून करण्यात आली आहे. इराण आणि अझरबैझान सीमेवर बांधण्यात आलेल्या एका धरणाच्या उद्घाटनासाठी अध्यक्ष रईसी तिकडे गेले होते आणि तेथून हेलिकॉप्टरने परतत असताना खराब हवामानात त्यांचे हेलिकॉप्टर भरकटले आणि त्यामुळे झालेल्या अपघातात 63 वर्षी रईसी यांचे निधन झाले. याच अपघातात इराणचे परराष्ट्र मंत्री होसेन अमिर यांचेही निधन झाले आहे. त्यामुळे इराणला बसलेला हा दुहेरी धक्का आहे. रईसी यांनी सन 2021 मध्ये इराणच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली होती. पण अल्पकाळातच त्यांची अशी अकाली एक्झिट झाली आहे. सध्या इराण आणि इस्रायल यांच्यात युद्धसदृश तणाव निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर रईसी यांचा हा नेमका अपघात होता की घातपात अशा चर्चांना आता मोठी हवा मिळाली आहे.

इस्रायलशी रईसी यांनी थेट पंगा घेतला होता आणि इस्रायल हा एक असा देश आहे की त्यांच्या देशावर हल्ला करणार्‍याला ते कशाही पद्धतीने संपवू शकतात. त्यांच्याकडे या संबंधातील अनेक प्रकारची तंत्रे आहेत. त्याचाच वापर त्यांनी केला असावा अशीही आता चर्चा सुरू झाली आहे. इराणच्या अध्यक्षांचे हे हेलिकॉप्टर बर्फाळ डोंगराळ भाग आणि धुक्यामुळे अपघातग्रस्त झाल्याचे प्राथमिक वृत्त असले तरी मिळालेल्या माहितीनुसार, अध्यक्षांच्या हेलिकॉप्टरबरोबर अन्यही तीन हेलिकॉप्टर्सचा ताफा होता आणि ती हेलिकॉप्टर्सही याच हवामानातून आणि याच डोंगराळ भागातून मार्गक्रमण करीत होती. त्यातील नेमके अध्यक्षांचेच हेलिकॉप्टर कसे कोसळले या शंकेतून हा घातपात होता काय अशी चर्चा सुरू झाली आहे आणि ती स्वाभाविक आहे.

इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला खोमेनी यांनी लोकांना या घडीला पूर्ण शांतता बाळगण्याचे आवाहन केले असून त्यांनी पर्यायी सरकारच्या व्यवस्थेचीही तयारी केली आहे. खोमेनी हे कसलाही मुलाहिजा न ठेवता भूमिका मांडणारे गृहस्थ आहेत. पण त्यांच्याकडून या प्रकारात काही घातपात असल्याची शंका व्यक्त केली गेलेली नाही. परिस्थिती निवळल्यानंतर इराणीयन यंत्रणा अपघाताच्या सर्वच शक्यतांचा अभ्यास करून दोन दिवसात आपला निष्कर्ष जाहीर करतील. पण अजूनपर्यंत तरी कोणत्याही बाजूकडून घातपाताची शंका घेण्यात आलेली नाही. हे जरी असले तरी पाश्चत्य माध्यमांनी मात्र या विषयीची चर्चा सुरू केली आहे. त्यांनी इराण-इस्रायल संघर्षाच्या घटनांचीही उजळणी केली असून त्याचे संदर्भ जुळवण्यास प्रारंभ केला आहे. इस्रायल सध्या गाझातील युद्धात व्यस्त आहे.

तेथील पॅलेस्टाइन समर्थक गनिम आणि हेजबुल्लाला संपवण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे, पण इराणने पॅलेस्टाइन गनिमांना पूर्ण समर्थन देऊन त्यांना लष्करी मदतही देऊ केली आहे. गाझावरील हल्ल्याचा बदला म्हणून इराणने थेट इस्रायली हद्दीतच हल्ले केले आहेत. त्यामुळे इस्रायल असा सहजासहजी शांत बसणारा देश नाही असे या पाश्चात्य माध्यमांचे व त्यांच्या तज्ज्ञांचे म्हणणे आहे. इराणच्या

सीरियातील दूतावासावर इस्रायली लढाऊ विमानांनी गेल्याच महिन्यात बॉम्ब हल्ला केल्याचा आरोप करीत त्याचा बदला घेण्यासाठी इराणने इस्रायलच्या हद्दीत काही क्षेपणास्त्र डागून इस्रायलला थेट आव्हान दिले होते. त्याला इस्रायलनेही प्रत्युत्तर दिले पण ते अगदी संयमी स्वरूपाचे होते. त्यांनी इराणच्या इसफाहन प्रांतातील क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या तळावर हल्ला केला होता.

पण हा विषय तेवढ्यावरच मर्यादित राहिला. अमेरिकेने इस्रायलला याबाबतीत संयम बाळगायला सांगितला होता. पण इस्रायल इतक्या सहजी शांत बसणारा देश नाही. त्यामुळे या अपघातात इस्रायलचाही अँगल तपासला गेला पाहिजे, असे पाश्चात्य युद्धतज्ज्ञांचे म्हणणे आहे. यावर आता बराच खल होईल. इस्रायलनेच हा घातपात घडवून आणला असेल तर त्याची जबाबदारी ते निर्भीडपणे घेतील. कारण त्यांचा तसा लौकिकच आहे. पण अजून तरी इस्रायलने या प्रकरणाबाबत कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. जोपर्यंत त्यांचे हे मौन सुटत नाही तोपर्यंत अशा शंका-कुशंकांची चर्चा सुरूच राहणार आहे. त्याला कोणाचाच इलाज नाही. मुख्य मुद्दा असा आहे की, एकाच वेळी अध्यक्ष आणि परराष्ट्र मंत्र्यांचा हेलिकॉप्टर अपघातात झालेला मृत्यू ही घटना इराणच्या सहजी पचनी पडणारी नाही.



### आजची चित्रोळी

लेंकूरवाळीं मुलांत रमतें
श्रमतें त्यांच्यासाठीं !
मायेचापण हांतही असतों
सदैव लेकरां पाठीं !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### चक्क उन्हामुळे 144 कलम लागू...

मात्र, या 144 कलमाचा अर्थ जमावबंदी अथवा लॉकडाऊन अशा अर्थाने काहीजण लावत आहेत , तो तसा लावण्यात येऊ नये, असेही जिल्हाधिकारी आयुष्य प्रसाद यांनी स्पष्ट केलं आहे. या संदर्भात माहिती देताना प्रसाद म्हणाले की, सध्या जिल्ह्यात उष्णतेची तीव्र लाट सुरु आहे. त्यामुळे, अशा काळात नागरिकांना आपत्ती व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने, उष्णतेच्या लाटेपासून नागरिकांचा बचाव करण्यासाठी प्रशासनाकडून काही सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

मुलांचे, महिलांचे आणि कामगारांचे उन्हापासून संरक्षण व्हावे, त्यांना कोणीही उन्हात काम करण्यास बाध्य करू नये आणि तसे कोणी करत असेल तर 144 या कलमान्वये संबधित व्यक्ती देखील त्या संस्थेविरोधात तक्रार करू शकते, असे जिल्हाधिकारी यांनी म्हटले. तसेच, अशा प्रकारची तक्रार कोणी केल्यास संबंधित सरकारी यंत्रणांकडे या संस्थेवर कारवाई करण्याचे अधिकार कलमान्वये आहेत. मात्र, याचा अर्थ कोणीही जमाव बंदी लावण्यात आली किंवा लॉकडाऊन करण्यात आले आहे, असा काढू नये. त्यातून जनतेमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकते, असे स्पष्टीकरणही जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले.

जळगाव अपघातीतील तिसऱ्या आरोपीला पोलीस कोठडी

जळगाव जिल्ह्यात रामदेव वादी येथे कार आणि दुचाकी अपघातामध्ये चार जणांचा जागेवर मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या अपघाताली कारचालकासह कारमधील एकास काल पोलिसांनी अटक करून न्यायालयात हजर केले होते. त्यानंतर ध्रुव सोनावणे या तिसऱ्या कार मधे बसलेल्या संशयित आरोपीस देखील पोलिसांनी आज अटक करून न्यायालयात हजर केले. त्यावेळी, न्यायालयाने उर्वरित दोन आरोपींप्रमाणेच ध्रुव सोनावणे यासदेखील 27 मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### स्वच्छता मोहिमेतून शनिवारी १३० मेट्रिक...

एल विभागात कुर्ला पूर्व येथे हशू आडवाणी चौक, शिवसृष्टी मार्ग, आर उत्तर विभागात दहिसर पूर्व येथे गणपत पाटील नगर, के पूर्व विभागात प्रभाग ७८ मध्ये झोपडपट्टी व तत्सम परिसर, पी उत्तर विभागात टाईम्स ऑफ इंडिया पूल परिसर, एस विभागात टागोर नगर, ए विभागात चर्चगेट येथील विठ्ठल ठाकरसी मार्ग, ज्ञानसम्राट मार्ग, डी विभागात श्रीमद् राजचंद्र मार्ग, गगनगिरी महाराज मठ ते तांबे चौक, एच पूर्व विभागात सांताक्रुज येथे कलिना जंक्शन ते रझाक जंक्शन, एच पश्चिम विभागात खार येथील चित्रकार धुरंदर मार्ग, आर दक्षिण विभागात ठाकूरगाव, समता नगर, एफ उत्तर विभागात प्रतीक्षा नगर, शास्त्री नगर, जी उत्तर विभागात माहीम कोळीवाडा, रेती बंदर, कॉज वे आदी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत संबंधित परिमंडळांतील उपआयुक्त, सहायक आयुक्त, अधिकारी, स्थानिक नागरिक सहभागी झाले होते.

### सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आढळले...

निसर्गानुभव कार्यक्रमासाठी उपस्थित प्रगणकांना व्याघ्र प्रकल्पातर्फे भेट म्हणून निसर्ग पुस्तके तसेच टी-शर्ट, टोपी भेट स्वरूपात देण्यात आले. रात्रीचे जंगल, वन्य प्राण्यांचे आवाज, निशाचर प्राण्यांची वर्तणुक इत्यादी रंजक माहिती मिळावी या उद्देशाने या वर्षी सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातर्फे निसर्गानुभव कार्यक्रम राबिवण्यात आला होता. निसर्गानुभव कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी व्याघ्र प्रकल्पाच् क्षेत्र संचालक श्री. एम. रामानुजम, उपसंचालक कोयना श्री. उत्तम सावंत तसेच उपसंचालक चांदोली स्नेहलता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पातील आठ वनक्षेत्रपाल यांनी परिश्रम घेतले. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रफळ हे १ हजार १६५.५७ चौ.कि.मी. असून व्याघ्र प्रकल्प हा सातारा, सांगली, कोल्हापूर आणि रत्नागिरी या चार जिल्ह्यात विस्तारले आहे. १५ नद्यांचा उगम या जंगलातून होतो.

### अहेरीवरुन अमरावतीकडे जाणाऱ्या बसचा...

या अपघातील जखमींना अहेरी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. विशेष म्हणजे या बसमध्ये बसचालकाची मुलगी देखील प्रवास करत होती. यात तिला देखील दुखापत झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अहेरी आगारचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.

रस्त्यातील खड्ड्याचा अंदाज न आल्याने बस पलटली

अहेरी आगाराची बस क्रमांक एम एच-07 सी 9463 ही अहेरी वरून 27 प्रवासी घेऊन नेहमीप्रमाणे अमरावतीच्या दिशेने जात होती. दरम्यान, धंनूर फाट्यावरील वनविभागाच्या नाक्याजवळ समोरून येत असलेल्या वाहनाला साईड देण्याच्या दरम्यान बाजूला खोल भाग असल्याने बस अचानक पलटली. हा अपघात इतका भीषण होता की बस कडेला जाऊन अक्षरक्ष:आडवी झाल्याचे बघायला मिळाले. सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झाली नाही. मात्र यातील काही प्रवाश्यांना गंभीर दुखापत झाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच अहेरी आगाराच्या व्यवस्थापकांनी घटनास्थळ गाठून परिस्थितीचा आढावा घेतला आणि जखमींना अहेरी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, या घटनेमुळे प्रवाशांमध्ये प्रचंड भीती निर्माण झाली आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनीही एकच गर्दी केल्याचे बघायला मिळाले.

विविध गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला 7 लाख 50 हजाराचा दारूसाठा अखेर न्यायालयाच्या आदेशावरून यवतमाळच्या अवधूतवाडी पोलिसांनी नष्ट केला. गेल्या काही वर्षात दारूबंदी कायद्या अंतर्गत विविध कारवाया केल्या आहेत. यामध्ये अवधूतवाडी पोलिसांनी आजपर्यंत अनेक दारू विक्रेत्यांवर कारवाई करून त्यांच्याकडून लाखोंची दारू जप्त करण्यात आली होती. या प्रकरणी जिल्हा सत्र न्यायालयात काही प्रकरणे सुरु होती.

न्यायालयात सुरु असलेल्या प्रकरणांचा न्यायालयाने निकाल लावला. तसेच पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आलेला दारूसाठा नष्ट करण्याचे आदेशही दिले. त्यामुळे अवधूतवाडी पोलिसांनी विविध गुन्हात जप्त केलेला 7 लाख 50 हजार रुपयांचा दारू साठा खड्डयात टाकून नष्ट केला आहे.

### “मग गुजरातमध्ये मुस्लिमांना आरक्षण का दिलं?” तेजस्वी यादवांचा नरेंद्र मोदींवर पलटवार

जमीन-नोकरी घोटाळा प्रकरणात लालू-तेजस्वी यांचे नाव न घेता पंतप्रधान मोदींनी यादव कुटुंबावर निशाणा साधला. त्यांनी गरिबांची लूट केली आणि नोकरीच्या बदल्यात त्यांच्या जमिनी घेतल्या. त्यांनी आता कान उघडून ऐकावं की त्यांच्या तुरुंगात जाण्याची वेळ सुरू झाली आहे, असं पंतप्रधान मोदी म्हणाले. हेलिकॉप्टरमधून प्रवास करण्याची वेळ संपताच तुरुंगात जाण्याचा मार्ग ठरवावा लागेल. बिहारची लूट करणाऱ्यांना एनडीए सरकार सोडणार नाही, असाही इशारा मोदींनी दिला.

याआधी पाटलीपुत्र येथे झालेल्या सभेतही नरेंद्र मोदींनीं मुस्लिम आरक्षणावरून आरजेडी आणि काँग्रेसला धारेवर धरलं होतं. बिहारमधील अतिमागास, ओबीसी, अनुसूचित जाती आणि जमातीच्या कुटुंबांना मी हमी देतो की जोपर्यंत ते जिवंत आहेत तोपर्यंत त्यांचे हक्क हिरावून घेऊ देणार नाहीत. मोदींसाठी संविधान सर्वोपरि आहे. इंडीया आघाडीला व्होटबँकेची गुलामगिरी करायची असेल किंवा तिथे जाऊन मुजरा करायचा असेल तर करा. पण मी अनुसूचित जाती आणि जमातीच्या, ओबीसी आरक्षणाच्या पाठीशी उभा आहे आणि उभा राहीन, असे मोदी म्हणाले.

मोदींनी केलेल्या टीकेला आता तेजस्वी यादव यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी माध्यमांशी बोलताना पंतप्रधान मोदींवर जोरदार निशाणा साधला. गुजरातमध्ये २५ मुस्लिम जातींना आरक्षण मिळाले आहे. मोदी तिथे १३ वर्षे मुख्यमंत्री होते, त्यांना हे माहीत नाही का? यावर ते का बोलत नाहीत?, असा सवाल तेजस्वी यादव यांनी केलाय.

“पंतप्रधान नरेंद्र मोदींना राज्यघटनेचे मूलभूत ज्ञानही नाही. संपूर्ण देशात जातीय जनगणना करण्यासाठी आम्ही पंतप्रधानांना पाच वेळा पत्रे लिहिली. बिहारचे शिष्टमंडळ त्यांना भेटायला गेले पण त्यांनी नकार दिला. पंतप्रधान मोदींनी आपली भाषा सुधारली पाहिजे आणि संविधानाचे मूलभूत ज्ञानही समजून घेतले पाहिजे,” असाही टोला तेजस्वी यादव यांनी लगावला.

### रत्नागिरी नगर परिषदेतर्फे ५० खाटांचे...

रत्नागिरी शहरातील मध्यवर्ती बसस्थानकाचे कामही येत्या दोन महिन्यांमध्ये पूर्ण होईल, असा विश्वास मंत्री सामंत यांनी व्यक्त केला. रहाटाघर बस स्थानकातील काँक्रिटीकरणासह इतर कामे १५ दिवसांत पूर्ण होणार असल्याचेही ते म्हणाले.

मिऱ्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे ६० कोटींचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून, ४१ कोटींच्या सुशोभीकरणाचे कामही लवकरच सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. रत्नागिरीतील पशुसंवर्धन दवाखान्याची इमारत उद्घाटनासाठी तयार आहे, असेही ते म्हणाले.

छत्रपतींचा पुतळा

रत्नागिरी शहरातील शिवसृष्टीचे काम ६० टक्के पूर्ण झाले असून, येत्या महिनाभरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवला जाणार आहे. लोकमान्य टिळक स्मारक नूतनीकरणाचा पहिला भाग पूर्ण झाला असून, तेथील उजव्या इमारतीमध्ये संशोधन केंद्र आणि वाचनालय सुरू केले जाईल, असेही उदय सामंत यांनी यावेळी सांगितले.

अमिताभ बच्चन यांचा आवाज

थ्रीडी मल्टिमीडियाचे काम पूर्णत्वास आले असून १५ ऑगस्टला त्याचे लोकार्पण होणार आहे. या थ्रीडी मल्टिमीडियामध्ये मराठीसाठी प्रसिद्ध अभिनेते सचिन खेडेकर यांच्यासह हिंदी आणि इंग्रजी आवाजासाठी महानायक अमिताभ बच्चन यांचा आवाज असेल, असं त्यांनी सांगितले.

साईडपट्ट्यांचे काम लवकरच

रत्नागिरी शहरातील काँक्रिटीकरणाचा मुद्दा सध्या ऐरणीवर आहे. हे काम पूर्णत्वास आले असून इतर रस्त्यांचे कामे अंतिम टप्प्यात आहेत. साईडपट्ट्यांचे रखडलेले कामही लवकरच पूर्ण होईल, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

### डोंबिवली कंपनी स्फोटातील आरोपीला...

सामाजिक हक्क संस्थेचे ॲड. आकाश कोईनवाड यांच्यातर्फे ॲड. प्रियेश सिंग यांनी हस्तक्षेप याचिका दाखल करून अमुदान कंपनीतील स्फोटामुळे सामाजिक जीवन ढवळून निघाले. सामान्यांचे जीव या दुर्घटनेत गेले, अनेक मालमत्तांचे नुकसान झाले आहे. या सर्व दुर्घटनेचा पोलिसांना सखोल तपास करायचा आहे. त्यामुळे आरोपीला जास्तीत जास्त कोठडी देण्याची मागणी केली. न्यायालयाने सर्व बाजू ऐकून २९ मेपर्यंत आरोपीला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

# उर्वरित महाराष्ट्रातही पाणी आहे...

महाराष्ट्रात पशुविज्ञान दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विद्यापीठ हे नागपुरात आहे. यातील मत्स्य व्यवसाय विद्यापीठाचे केंद्र हे नागपूरहून रत्नागिरी येथे कोकणात स्थलांतरित करावे अशी मागणी विद्यापीठ अनुदान आयोग आणि केंद्रीय नियोजन नियोजन आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर भालचंद्र मुणगेकर यांनी केली असल्याचे वृत्त आहे. ही मागणी करताना जिथे पाणी नाही तिथे मत्स्य व्यवसायाचा अभ्यास कसा करणार असा प्रश्नही डॉक्टर मुणगेकरांनी उपस्थित केल्याचे वृत्त आहे.

डॉ. मुणगेकरांनी ही मागणी करताना ते नियोजन मंडळाचे अध्यक्ष असताना २०११ साली केंद्र शासनाला सादर करण्यात आलेल्या एका अहवालाचा दाखला दिला आहे. या संदर्भात. आजच्या दैनिक वित्तमबातमीमध्ये आलेले निवेदन वाचले तर डॉक्टर मुणगेकरांनी मत्स्य व्यवसाय अभ्यासताना फक्त समुद्री मत्स्य व्यवसायाचाच विचार केला आहे असे दिसून येते. वस्तूतः मत्स्य व्यवसायात समुद्रात उपलब्ध होणारे खारे मासे आणि उर्वरित नदी आणि तलावांमध्ये उपलब्ध होणारे गोडे मासे असे दोन प्रकार ढोबळमानाने करता येतात. महाराष्ट्रात समुद्री किनारा फक्त ७२० किलोमीटर आहे. या समुद्री किनाऱ्या लगतचा जवळजवळ साडेतीन लाख हेक्टर परिसर सोडल्यास उर्वरित महाराष्ट्रात जिथे कुठे मत्स्य व्यवसाय होतो तो गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसाय होत असतो. आज कोकणात समुद्रातील माशांचा मोठा व्यवसाय सुरू आहे. मात्र त्याचवेळी इकडे दुसऱ्या टोकाला चंद्रपूर, गडचिरोली भंडारा, गोंदिया या क्षेत्रातही तिथल्या नद्या आणि तलावांमध्ये होत असलेला मत्स्य व्यवसाय हा डॉ. मुणगेकरांनी हिशेबात धरलेला दिसत नाही. जाणकारांच्या माहितीनुसार आज कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रात ठीक ठिकाणी छोट्या मोठ्या प्रमाणात हा गोड्या पाण्यातील माशांचा मत्स्य व्यवसाय सुरू आहे. चंद्रपूर गडचिरोली परिसरातील गोड्या पाण्यातील झिंगे नामक मार्से आजही पट्टीच्या खवय्यांची गरज आहेत. मात्र इथे आवश्यकता आहे ती या व्यवसायाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची. जर इथे गांभीर्याने लक्ष दिले तर उर्वरित महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी हा अतिरिक्त उत्पन्न देणारा व्यवसाय ठरू शकतो, आणि त्यायोगे आज ज्या शेतकरी आत्महत्यांमुळे महाराष्ट्र बदनाम झाला आहे, त्या शेतकरी आत्महत्या देखील कमी केल्या जाऊ शकतात. आज कोकणात ७२० किलोमीटर समुद्रकिनारा आहे. त्याला लागून अतिविशाल असा अरबी समुद्र आहे. त्यामुळे तिथे मत्स्य व्यवसाय होतो यात वावगे काहीच नाही. मात्र उर्वरित महाराष्ट्रात ठीकठिकाणी मोठमोठ्या नद्या आहेत, त्यात विदर्भात वैनगंगा, पैनगंगा, आहेत तर खानदेशात गोदावरी आहे, आणि पश्चिम महाराष्ट्रात कृष्णा कोयना ही आहेत. याशिवाय या प्रत्येक क्षेत्रात अनेक लहान-मोठे तलाव आहेत. ठिकठिकाणी असलेल्या नद्यांवर बंधारे बांधले गेले आहेत, आणि त्यायोगे तिथे जलाशय निर्माण झाले आहेत. या सर्व ठिकाणी माशांचे उत्पादन कमी जास्त प्रमाणात होतेच. शास्त्रशुद्ध पद्धतीने हे उत्पादन वाढवता कसे येईल आणि त्यातून शेतकऱ्यांना लाभ कसा देता येईल या दृष्टीने विचार व्हायला हवा. हा विचार करण्यासाठीच मत्स्य व्यवसाय विद्यापीठ महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

आज पशुवैद्यक दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विद्यापीठ हे नागपूरात आहे. मुंडेकरांच्या मते नागपुरात पाणी नाही. त्यामुळे या विद्यापीठाचे मत्स्य व्यवसाय केंद्र वेगळे करून ते कोकणात स्थलांतरित करायला हवे. या संदर्भात माहिती घेतली असता महाराष्ट्रात मत्स्य व्यवसाय विषयाला वाहिलेले एकच महाविद्यालय असून ते रत्नागिरी येथे आहे. त्यामुळे रत्नागिरीच्या मंडळींना नागपुरात असलेल्या पशुवैद्यक आणि मत्स्य व्यवसाय विद्यापीठाचा हस्तक्षेप नको आहे. नागपुरातील पशुवैद्यक विद्यापीठ सुरू होण्यापूर्वी रत्नागिरीचे हे मत्स्य व्यवसाय महाविद्यालय दापोलीच्या कृषी विद्यापीठा अंतर्गत कार्यरत होते. ते तसेच राहावे म्हणजे रत्नागिरीच्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या मंडळींना रत्नागिरीतच राहता येईल. त्यांच्या नागपूरला बदल्या होणार नाहीत यासाठी हे केंद्र रत्नागिरीलाच स्थलांतरित व्हावे असा आग्रह केला जातो आहे. त्यामुळेच मग नागपुरात पाणी नाही तरी मत्स्य व्यवसाय विद्यापीठ कसे असा प्रश्न मुणगेकरांकडून उपस्थित केला जातो आहे.

मात्र इथे मुणगेकर एक मुद्दा विसरतात. रत्नागिरी मध्ये एक मत्स्य व्यवसाय महाविद्यालय आहे. या महाविद्यालयातून त्या परिसरातील समुद्री माशांचा मत्स्य व्यवसाय कसा वाढवता येईल आणि त्यायोगे कोकणातील माणूस अधिक सक्षम कसा करता येईल हा विचार होऊ शकतो. त्यासाठी तिथे विविध संशोधने केली जाऊ शकतात. मात्र त्या ठिकाणी गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसाय कसा वाढवायचा हा विचार कितपत सक्षमतेने केला जाऊ शकेल याचेही उत्तर मुंणगेकरांनी द्यायला हवे. आज महाराष्ट्राची मत्स्यबीजांची जी गरज आहे ती सद्यस्थितीत भागवली जात नाही अशी माहिती आहे. अशावेळी या सर्वच स्त्रोतांचा उपयोग करून गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसाय वाढवता येऊ शकतो, आणि महाराष्ट्राची गरज भागवून इतर भागात देखील मत्स्यबीज आणि मासळी पुरवली जाऊ शकते. आज वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्रात ठीक ठिकाणी मोठमोठ्या नद्या आहेत. अनेक जलाशय देखील आहेत. नव्या धोरणानुसार ज्यांच्याकडे पाच एकरहून अधिक शेतजमीन आहे तिथे शेततळी देखील तयार केली जात आहेत. या शेततळ्यांमध्ये देखील मत्स्य व्यवसाय केला जाऊ शकतो. विदर्भातील भंडारा गोंदिया आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये जवळजवळ साडेआठ हजार माजी मालगुजारी तलाव आहेत. त्यातील अनेक तलाव अतिक्रमणामुळे बुजवले गेले आहेत. अनेक तलाव कोरडे पडलेले आहेत. हे सर्व तलाव जर त्यातील गाळ काढून स्वच्छ केले अतिक्रमणही हटवले तर या ठिकाणी गोड्या माशांचा मत्स्य व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू होऊ शकतो. अशावेळी नागपुरात इतकेच काय तर छत्रपती संभाजी नगर, नाशिक आणि कोल्हापूर येथे देखील मत्स्य व्यवसायासाठी अभ्यास केंद्र सुरू करून त्यायोगे नवे नवे प्रयोग करून हा व्यवसाय कसा वाढवता येईल आणि आज आत्महत्ये कडे वळणाऱ्या शेतकऱ्यांना जगण्याची नवी दिशा कशी दाखवता येईल याचाही विचार होऊ शकतो. गोड्या पाण्यातला मत्स्य व्यवसाय वाढवायचा तर फक्त अभ्यास केंद्रेच हवीत असे नाही, तर त्यासाठी काही कायदे देखील करावे लागतील असे जाणकारांचे मत आहे. महाराष्ट्राचे एक सुविद्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विदर्भातील नागपूर चंद्रपूर गडचिरोली भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये फिशरीज कॉरिडॉर तयार करण्याची संकल्पना मांडली होती त्या दृष्टीने शासन स्तरावर हालचाली देखील सुरू झाल्या होत्या. या हालचालींना गती येऊन ही संकल्पना प्रत्यक्षात कशी येईल आणि त्या दृष्टीने त्यायोगे महाराष्ट्रात फक्त ७२० किलोमीटरच्या सागरी किनाऱ्यावरच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात हा मत्स्यव्यवसाय कसा वाढवता येईल आणि त्यायोगे शेतकरी संपन्न कसा करता येईल या दृष्टीने विचार व्हायला हवा. डॉ. मु मुंणगेकर हे एक सुविद्य अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले गेले आहेत. त्यांनी कायम महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास कसा होईल असाच प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांनी आता फक्त कोकणचा विचार न करता समग्र महाराष्ट्राचा विचार करावा, कोकणासोबत उर्वरित महाराष्ट्रालाही महाराष्ट्रातही पाणी आहे हे लक्षात घेऊन त्यांनी नियोजन करण्यात पुढाकार घ्यावा इतकेच इथे सुचवावेसे वाटते.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)



# ठाण्यात केवळ ६० टक्के नालेसफाई

● ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रात नालेसफाईची कामे केवळ ६० टक्केच पूर्ण झाल्याचे समोर येत आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात नाले तुंबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, नाले सफाईची कामे वेगाने सुरू असून ३१ मेपर्यंत सगळे काम पूर्ण होतील असा दावा ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केला आहे.

महापालिका आयुक्त राव यांनी नालेसफाईच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. अनेक ठिकाणी नालेसफाई झाली नाही. नालेसफाईची कामे उशिराने सुरू झाल्याने केवळ ६० टक्केच नालेसफाई झाल्याचे समोर आले आहे. येत्या काही दिवसांवर पावसाळा आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी संपूर्ण नालेसफाई झाली नाही तर, नाले तुंबून त्याचा परिणाम नागरिकांना सहन करावा लागणार आहे.

आयुक्त राव यांनी सर्वप्रथम, कळवा येथील महात्मा फुले नगर येथील नाल्यातील गाळ काढण्याचा कामाचा आढावा घेतला. रस्त्यावर आलेला गाळ लवकर हटवून रस्ता पूर्णपणे वाहतुकीसाठी मोकळा करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी दिल्या. वस्तीमधील नाल्यात टाकला जाणारा कचरा रोखण्यासाठी या नाल्यांवर जाळया बसवाव्यात. त्यात साठणारा कचरा नियमितपणे उचलला जावा. नाल्यात वारंवार पडणारा कचरा साठून पावसाळ्यापूर्वी होणारी कसरत आणि कोट्यवधींचा खर्च कमी होईल. त्यादृष्टीने पावले उचलण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत.

नाल्यात कचरा टाकू नये यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात यावी. तसेच, स्थानिक स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, युवक यांची मदत घ्यावी, असेही राव यांनी सांगितले. उथळसर प्रभाग समितीतील ऋतू पार्क येथील नालेसफाईचे काम राव यांनी पाहिले. कापूरबावडी, थिराणी, वागळे इस्टेटमधील आनंद इंडस्ट्रीज येथील नाला, सुपरमॅक्स कंपनी लगतचा नाला, परब वाडी येथील नाल्यांच्या सफाईची देखील आयुक्त राव यांनी पाहणी केली. मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात नालेसफाईचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला ५ जूनपर्यंत काम पूर्ण करण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे, अशी माहितीही आयुक्त राव यांनी दिली.

## थोडक्यात



### तस्करीसाठी आलेल्या तरुणाला बेड्या, दोन पिस्तुलांसह चार काडतुसे जप्त

● ठाणे - ठाण्यातील तीन हात नाका परिसरात शस्त्र तस्करीसाठी आलेल्या धनंजयकुमारसिंग तारकेश्वरसिंग (२४, रा. मझवालिया, बिहार) याला अटक केल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विकास घोडके यांनी शुक्रवारी दिली. त्याच्याकडून दोन देशी बनावटीचे पिस्तूल, चार मॅगझिन आणि चार जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत.

तीन हात नाका परिसरात बेकायदेशीर पिस्तूल विक्री करण्यासाठी तस्कर येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक विकास घोडके यांना मिळाली होती. त्याआधारे २३ मे २०२४ रोजी दुपारी १:१५ च्या सुमारास सापळा रचून घोडके यांच्या पथकाने त्याला अटक केली. त्याच्याकडून तस्करीसाठी आणलेली दोन देशी पिस्तूल, चार मॅगझिन आणि चार जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत. आरोपीविरुद्ध वागळे स्टेट पोलिस ठाण्यात बेकायदेशीर शस्त्र बाळगण्यासह त्याची विक्री केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी कोणाला पिस्तूल विक्री करण्यास आला होता, याचा तपास करण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### भिवंडीत बनावट एव्हरेस्ट आणि मॅगी मसाला विक्री

● भिवंडी : बनावट एव्हरेस्ट मसाले विक्री करणाऱ्यांचा शांतीनगर पोलिसांनी पर्दाफाश केला असून दोघा जणांना ताब्यात घेत त्यांच्या जवळून १ लाख ८ हजार रुपये किंमतीचे बनावट मसाल्याचे पाकीट जप्त करण्यात आले असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली आहे. भिवंडी शहरात एका टेम्पो मधून बनावट पॅकिंग केलेला एव्हरेस्ट मसाला विक्रीसाठी येणार असल्याची माहिती शांतीनगर शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांना समजली. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांसह पोलीस निरिक्षक (प्रशा) विनोद पाटील, पोलीस निरिक्षक (गुन्हे) अतुल अड्डुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सुरेश घुगे, संतोष पवार, श्रीकांत पाटील, पोलीस कर्मचारी किरण जाधव, नरसिंह क्षीरसागर, रोशन जाधव, रविंद्र पाटील, तौफिक शिकलगार यांनी जब्बार कंपाऊंड शांतीनगर या रस्त्यावर सापळा कारवाई केली.

त्या ठिकाणी जोगेश्वरी येथून संशयित टेम्पो आला असता त्यास थांबवून त्याची तपासणी केली. त्यामध्ये १ लाख ८ हजार रुपये किमतीचे एव्हरेस्ट चिकन मसाला, एव्हरेस्ट मटण मसाला आणि मॅगी मसाल्याचा बनावट मालाचे पॅकेट आढळून आले. टेम्पो चालक महेश लालताप्रसाद यादव आणि माल विक्रीसाठी आलेला मोहमद सलमान मोहमद अफजल प्रधान यांना ताब्यात घेतले. चौकशीत हा बनावट माल गुजरात राज्यातील सूरत येथील फॅक्टरीमध्ये बनवून महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांत विक्री केला जात असल्याचे समजले. पोलीस पथकाने सुरत येथील ईश्वरनगर सोसायटी, पर्वतगाव येथे छापा टाकला असता तेथे करण सुरेशभाई मेवाडा हा बनावट मसाला तयार करीत असल्याचे आढळून आले. पोलीस पथकाने तेथील कच्चा माल आणि मशीन, फॅक्टरी सील करून कारवाई केली आहे.

खऱ्या एव्हरेस्ट मसाले पाकिटावर ई हॉलमार्क असतो. परंतु बनावट पाकिटावर असा हॉलमार्क आढळून आला नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा हा प्रकार असल्याचे स्पष्ट करीत एव्हरेस्ट कंपनीचे सेल्समन सचिन काशीनाथ पासलकर यांच्या तक्रारीवरून या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. नागरिकांनी सुध्दा आपण वापरीत असलेले पॅकबंद खाद्य पदार्थ खरेदी करीत असताना त्याच्या खरेपणाची खात्री करून घ्यावी, तसेच अशा कंपन्यांनीही मालाची सत्यता ग्राहकांना ओळखता यावी यासाठी जनजागृती करण्याची गरज असल्याचे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी केले आहे.

# तीन महिन्यांच्या नवजात मुलीची पाच लाखांमध्ये विक्री, आईसह नऊ जणांना मुंब्र्यातून अटक

● ठाणे - अवघ्या ८४ दिवसांच्या नवजात बाळाची (मुलीची) पाच लाखांमध्ये विक्री करणाऱ्या साहिल उर्फ सद्दाम हुसेन खान (३२, रा. मुंब्रा) या दलाल आणि मुलीच्या आईसह नऊ जणांना ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने अटक केल्याची माहिती पोलिस उपायुक्त पराग मणेरे यांनी शुक्रवारी दिली. नाशिक येथून आणलेल्या या बाळाचीही आरोपींच्या तावडीतून सुटका केली आहे.



मुंब्रा येथे नवजात बाळाची बेकायदा विक्री होणार असल्याची माहिती ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध पथकाच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक चेतना चौधरी यांना मिळाली होती. त्याचआधारे अतिरिक्त पोलिस आयुक्त डॉ. पंजाब उगले आणि उपायुक्त पराग मणेरे यांच्या मार्गदर्शनाखाली चौधरी यांच्या पथकाने बनावट ग्राहकाच्या माध्यमातून या टोळीशी संपर्क केला होता. दरम्यान, या टोळीतील दोघा दलालांनी २२ मे रोजी बनावट ग्राहकाशी संपर्क साधून त्यांच्याकडे एक तीन महिन्यांची मुलगी विक्रीसाठी असल्याचे सांगितले. या बाळासाठी पाच लाख रुपये द्यावे लागतील, असेही दोघा दलालांनी बनावट ग्राहकाला सांगितले. पोलिसांनी सांगितल्याप्रमाणे बनावट ग्राहकाने या टोळीस बाळ खरेदी करण्यास संमती दर्शवली. त्यानंतर २३ मे रोजी या टोळीतील सात जण बाळाला घेऊन नाशिकहून मुंब्र्यात आले. यावेळी पोलिसांनी पहाटे सहाच्या सुमारास मुंब्रा रेतीबंदर बस स्टॉप येथे सापळा लावून सहा जणांना अटक करून बाळाची सुखरूप सुटका केली. या टोळीतील अन्य एकास त्याच दिवशी मुंब्र्यातून अटक केली.

या बाळाची आई आणि एका तृतीयपंथीयाला नाशिक येथून अटक केली. साहिल उर्फ सद्दाम याच्यासह साहिदा रफिक शेख (४०, अमृतनगर, मुंब्रा), खतीजा सद्दाम हुसेन खान (२७, मुंब्रा), प्रताप किशोरलाल केशवानी (२३, उल्हासनगर), मोना सुनील खेमाने (३०, टिटवाळा), सुनीता सर्जेराव बैसाने (३५, नाशिक), सर्जेराव बैसाने (नाशिक), शालू कैफ शेख (२५, नाशिक, बाळाची आई) आणि तृतीयपंथी राजू वाघमारे (३०, नाशिक) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या टोळीच्या ताब्यातून बाळाची पोलिसांनी सुखरूप सुटका केली असून, या बाळास विश्व बालक केंद्र, नेरूळ नवी मुंबई येथे ठेवण्यात आले आहे. याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# कल्याण डोंबिवली महापालिकेच्या परिवहन सेवेचा रौप्य महोत्सव साजरा



● कल्याण : 23 मे रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाला 25 वर्षे पूर्ण झाली त्याबद्दल गणेश घाट आगार याठिकाणी रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी परिवहन व्यवस्थापक डॉ. दिपक सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आगारात सत्यनारायणाची महापूजा तसेच आरोग्य शिबीर आणि छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिवहन कर्मचारी ज्ञानेश्वर रहाणे यांच्या संकल्पनेतून पंचवीस किलोचा केक केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या हस्ते कापण्यात आला. याप्रसंगी आयुक्तांनी कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देताना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत सकारात्मक भूमिका मांडली आहे

कार्यक्रमाचे सुत्र संचालन शरद जाधव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिवहनचे अधिकारी कार्यालय अधीक्षक प्रिया निगडे, किशोर घाडी, तृषार्त मुळीक, प्रमोद बागुल, दिपक चौधरी, भारत सांगळे, मच्छिंद्र कणसे, संदीप दलाल, प्रशांत जावळे, गंगाधर राठोड, गौरख पवार तसेच सर्व कर्मचारी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या सुरवातील शरद जाधव यांनी परिवहन उपक्रमाची माहिती दिली.

# यंदाच्या पावसाळ्यात घोडबंदर कोंडीत



ठाणे : ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या मार्गपैकी एक असलेल्या घोडबंदर मार्गावर गेल्याकाही दिवसांपासून रस्ता रुंदीकरण, भुयारी गटारांची निर्मिती आणि डांबरी रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण कामे सुरू झाली आहेत. या कामांमुळे घोडबंदर मार्गावरील सेवा रस्ते, अंतर्गत रस्ते विविध प्राधिकरणांकडून खोदण्यात आले आहेत. त्याचा परिणाम घोडबंदर मार्गावरील वाहतूक व्यवस्थेवर बसत आहे. येत्या काही दिवसांत पावसाची शक्यता आहे. रस्ते खोदकामे करण्यात आल्याने घोडबंदरमधील नागरिकांना पावसाळ्यात मोठ्या कोंडीच्या सामन्याला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

घोडबंदर मार्ग परिसरात कापूरबावडी ते गायमुखपर्यंत लोकवस्ती वाढली आहे. मुंबईपासून ठाणे शहर तुलनेने जवळ असल्याने या भागात गृहखरेदी करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. तसेच गुजरात येथून उरण जेएनपीटी, भिवंडी आणि नाशिक भागात वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूकही घोडबंदर मार्गावरून होत असते. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या मार्गपैकी हा मार्ग महत्त्वाचा आहे. असे असले तरी विविध प्राधिकरणांमार्फत येथे कामे सुरू आहेत.

■ पाच वर्षांहून अधिक काळापासून या मार्गावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून मेट्रो मार्गिकेच्या मेट्रो चार या वडाळा-घाटकोपर-कासारवडवली मार्गिकेचे काम सुरु आहे. या मार्गिकेच्या निर्माणासाठी घोडबंदर मार्गावर ठिकठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. तसेच खोदकामाच्या भोवती पत्रे उभारण्यात आले आहेत. त्यामुळे मुख्य मार्गिका अरुंद झाल्या आहेत. त्याचा परिणाम नागरिकांना सहन करावा लागत आहे. असे असतानाच, घोडबंदर मार्गिकेच्या रुंदीकरणाचा निर्णय घेण्यात आला आहे.

# एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाईत 85 हजार दंडात्मक रक्कम तसेच 39.750 किलो प्लास्टिक जमा

● नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र एकल वापर प्लास्टिकमुक्त असावे यादृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने याविषयी जनजागृती करण्यासोबतच महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. सर्वच विभाग कार्यक्षेत्रात संबंधित विभागांचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तेथील स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्या माध्यमातून कारवाई केली जात आहे.



अशा एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमेअंतर्गत 15 ते 22 मे 2024 या आठवड्याभराच्या कालावधीत विभागीय कार्यक्षेत्रात 71 ठिकाणी तपासणी करण्यात आली आणि दंडात्मक कारवाई तसेच प्लास्टिक जप्तीची कारवाई करण्यात आली. यामध्ये दोषी आढळलेल्या 17 व्यावसायिक व आस्थापनांकडून एकूण रू. 85 हजार दंडात्मक रक्कम तसेच 39 किलो 750 ग्रॅम प्लास्टिक पिशव्यांचा साठा तसेच एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले.

यामध्ये बेलापूर विभागात 7 व्यावसायिक / आस्थापनांवर कारवाई करीत 35 हजार दंडात्मक रक्कम व 24 किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. वाशी विभागात 3 व्यावसायिक / आस्थापनांवर कारवाई करीत 15 हजार दंडात्मक रक्कम व 3 किलो एकल वापर प्लास्टिकची जप्ती केली. ऐरोली विभागातही 3 व्यावसायिक / आस्थापनांवर कारवाई करण्यात आली व त्यामध्ये 15 हजार दंड वसूली व 10 किलो 500 ग्रॅम एकल वापराचे प्लास्टिक जप्ती करण्यात आली. परिमंडळ 2 विभागाच्या भरारी पथकाने 4 व्यावसायिकांवरील कारवाईत 20 हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि 2 किलो 250 ग्रॅम एकल वापर प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला.

अशाप्रकारे या आठवड्यात 17 व्यावसायिक / आस्थापनांकडून 85 हजार दंडात्मक रक्कम वसूली तसेच 39 किलो 750 ग्रॅम एकल वापर प्लास्टिकचे साहित्य जप्त करण्यात आलेले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ही एकल प्लास्टिक वापर प्रतिबंधात्मक कारवाई अशीच सुरू राहणार असून नागरिकांनीही पर्यावरणास व मानवी जीवनास विघातक अशा एकल वापर प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# शासकीय वसतीगृहाचा स्लॅब कोसळून कर्मचारी गंभीर जखमी

## वसतीगृहाच्या दुरावस्थेमुळे विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला

● कल्याण : कल्याणमध्ये असलेल्या मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतीगृहाच्या छताचा स्लॅब कोसळल्याने एक कर्मचारी गंभीर जखमी झाला आहे. यामुळे वसतीगृहाच्या दुरावस्थेमुळे विद्यार्थी जीव मुठीत घेऊन राहत आहेत. याबाबत मनसेचे माजी आमदार प्रकाश भोईर यांनी या वसतीगृहाची पाहणी करत प्राशासनाच्या कारभारावर ताशेरे ओढले असून गौरीपाडा येथे वसतीगृहाची इमारत तयार असून ती धुळखात पडून आहे. या इमारतीत हे वसतीगृह हलविण्याची मागणी त्यांनी केली आहे.

कल्याण पश्चिमेतील बेतूरकर पाडा येथे गौरी टॉवर या इमारतीत पाचवा, सहावा आणि सातव्या मजल्यावर महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण संचालनालयाचे मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह आहे. येथील पाचव्या मजल्यावरील खोलीमध्ये वसतीगृहाचा कर्मचारी रामचंद्र जाधव हे झोपले असताना त्यांच्याअंगावर छताचे स्लॅब कोसळल्याने गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



या वसतीगृहात ४५ विद्यार्थी राहत असून या वसतीगृहाची अत्यंत दुरावस्था झाली आहे. हि इमारत देखील अनेक वर्षे जुनी असून ७ मजली इमारतीची लिफ्ट देखील बंद आहे. पायी जीने चढून या विद्यार्थ्यांना हे वसतीगृह गाठावे लागते. येथे असलेले बेड देखील जुने आणि गंजले असून मुलांना बेडवर आंथरण्यासाठी चादर देखील उपलब्ध नाहीत. दोन खोल्यांमध्ये तर बेडचे फक्त सांगाडे असून या दोन रूममध्ये कबुतरांनी ताबा घेत कबुतरखाना बनविला आहे. या घटनेची माहिती मिळताच मनसेचे माजी आमदार तथा शहर अध्यक्ष प्रकाश भोईर यांनी वसतीगृहाला भेट देत पाहाणी केली. तसेच रुग्णालयात जाऊन जखमी कर्माचाऱ्याची विचारपुस केली. भोईर आमदार असतांना त्यांनी कल्याण पश्चिमेत वसतीगृह मंजूर करून आणले. गौरीपाडा येथे वसतीगृहाची इमारत तयार असून देखील धूळखात पडली आहे. या ठिकाणी केडीएमसीचे कामगार राहत असल्याची बाब उघडकीस आली आहे. या तयार इमारतीत हे वसतीगृह स्थलांतरित करण्याची मागणी त्यांनी केली आहे. यावेळी मनसेचे उपशहर अध्यक्ष गणेश चौधरी, सचिन पोपलाईतकर, उपशाखा अध्यक्ष दिनेश साळवे, मनविसे उपशहर अध्यक्ष विराज चौधरी, प्रथमेश चव्हाण, सचिन नाईक, किरण तांबे, सुमेध जाधव आदि पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

तर याबाबत या वसतीगृहाचे गृहपाल प्रविण मढावी यांना विचारले असता, कर्मचारी झोपेत असतांना हि घटना घडली असून या जखमी कर्मचाऱ्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या ४५ पैकी ३५ विद्यार्थी राहण्यास असून या विद्यार्थ्यांना भिवंडी आणि उल्हासनगर येथील वसतीगृहात स्थलांतरित केले आहे. तर गौरीपाडा येथे तयार असलेल्या इमारतीचा पुढील दोन महिन्यांत ताबा मिळणार असल्याचे सांगितले.



## 'सिंघम अगेन' मधील अजय देवगणचा पहिला लूक आला समोर

बॉलीवुड अभिनेता अजय देवगणचं नाव घेतलं की त्याची 'सिंघम' व्यक्तिरेखा डोळ्यासमोर आल्याशिवाय राहत नाही. हाच प्रेक्षकांचा लाडका सिंघम पुन्हा एकदा आपल्या भेटीला येण्यासाठी सज्ज झालाय. अजय देवगण पुन्हा एकदा 'सिंघम अगेन' या चित्रपटातून आपल्याला डॅशिंग पोलिसाच्या भूमिकेत दिसेल. त्याच्या या आगामी चित्रपटाचे चित्रीकरण सध्या जम्मू-काश्मीर मध्ये सुरु झाले आहे. या चित्रपटातील अजय देवगणचा पहिलाच लूक चाहत्यांसमोर आला आहे. अजय देवगणसोबतच अक्षयकुमार, रणवीर सिंग, टायगर श्रॉफ, करीना कपूर, दीपिका पदुकोण आणि अर्जुन कपूर यांच्याही या सिनेमात महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.

'सिंघम अगेन'चे दिग्दर्शक रोहित शेट्टी यांनी शुक्रवारी या चित्रपटातील अजय देवगणची पहिली झलक आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून शेअर केली आहे. या लूकमध्ये अजय देवगण सिंघमच्या रुपात अवतरलेला दिसतोय. त्याच्या पाठी उभ्या असलेल्या अनेक पोलिसांच्या गाड्यांमुळे त्याचा हा लूक सिंघम चित्रपटाच्या सिरीजपेक्षा सूर्यवंशी फिल्मशी मिळताजुळता वाटतोय असं चाहत्यांचं म्हणणं आहे. सूर्यवंशी चित्रपट 2021 मध्ये आला होता. या चित्रपटात अजय देवगण आणि रणवीर सिंग यांनी पाहुण्या कलाकाराच्या भूमिका केल्या होत्या. यानंतरच 'सिंघम अगेन' मध्ये अक्षयकुमार आणि रणवीर सिंग यांना एकत्र पाहायला मिळेल असं जाहीर करण्यात आलं होतं.

'सिंघम अगेन' ही 'सिंघम सिरीज' मधली रोहित शेट्टीची तिसरी फिल्म आहे. 'सिंघम अगेन' ची रिलीज डेट 15 ऑगस्ट ठरवण्यात आली होती. परंतु पुष्पा 2 हा चित्रपटदेखील याचदरम्यान प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे 'सिंघम अगेन' च्या रिलीज डेटबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. त्याच्या नव्या रिलीज डेटबद्दल अजूनही खात्रीशीर तारीख मात्र अद्याप समोर आलेली नाही.

# थायरॉइड रुग्णांचा आहार कसा असावा ?



थायरॉईड ही शरीरासाठी अत्यंत महत्वाची ग्रंथी आहे. या ग्रंथीमधून थायरॉक्सिन हार्मोन बाहेर पडतो. हा हार्मोन इतका महत्वाचा आहे की, तो कमी असेल किंवा जास्त असेल अशा दोन्ही परिस्थितीत आजार होऊ शकतो. जेव्हा थायरॉईड होतो तेव्हा स्नायूंमध्ये खूप वेदना होतात. परिणामी, सांधेदुखी, ड्राय स्किन, लठ्ठपणा अशा समस्या जाणवू शकतात. त्यामुळे थायरॉईड रुग्णांनी त्याच्या आहाराबाबत अधिक सजग असणे आवश्यक असते. त्यामुळे, आज जागतिक थायरॉईड दिनानिमित्त या रुग्णांचा आहार कसा घ्यावा. हे जाणून घेऊयात.

थायरॉईड रुग्णांनी काय खावे?

कमी आणि जास्त थायरॉईड अशा दोन्ही परिस्थितीत व्हिटॅमिन D चे पुरेसे सेवन आवश्यक आहे. यासाठी थायरॉईड रुग्णांनी मासे, अंड , दूध आणि मशरूमचे सेवन करावे.

सेलेनियम हा एक आवश्यक घटक आहे जो शरीराची प्रतिकारशक्ती आणि प्रजनन क्षमता प्रभावित करतो. त्यामुळे थायरॉईड ग्रंथीच्या सुरळीत कार्यासाठी अन्नामध्ये पुरेसे सेलेनियम असणे आवश्यक आहे. यासाठी थायरॉईड रुग्णांनी अक्रोड, बदाम यासारखा सुका मेवा खायला हवा.

थायरॉइडच्या रुग्णांनी अंड खायला हवे. अंड्यातील पिवळ्या भागामध्ये आयोडीन, सेलेनियम असते आणि पांढरा भाग प्रोटिन्सनी भरलेला असतो. यासाठी थायरॉईड रुग्णांनी आहारात मांस आणि अंड खायला हवे. थायरॉईड रुग्ण चिकन,ट्यूना, कोळंबी यासारखे सीफूड खाऊ शकता.

सर्व प्रकारच्या भाज्या थायरॉईड रुग्णांनी खायला हव्यात. पण एक गोष्ट लक्षात घ्या, कोबी, ब्रोकोली सारख्या भाज्या कमी खाव्यात.

थायरॉईड रुग्णांनी बेरी, केळी, संत्री, टोमॅटो आदी फळे खा.

दूध, चीज, दही आदींसह सर्व प्रकारचे दुग्धजन्य पदार्थ थायरॉईड रुग्णांनी खायला हवेत. याव्यतिरिक्त भरपूर पाणी प्या आणि कॅफिन नसलेले पेय प्या.

थायरॉईड रुग्णांनी काय खाऊ नये?

थायरॉइडच्या रुग्णांनी फायबरयुक्त भाज्यांचे सेवन करू नये.

तुम्हाला थायरॉईड असेल तर सोया प्रोडक्टसचे सेवन अजिबात करू नये. कारण अशाने थायरॉइडची समस्या अधिक वाढू शकते.

थायरॉईड रुग्णांनी ब्रेड, बर्गर, केक, कांडी यासारखे ग्लुटेनयुक्त पदार्थ खाणे टाळवे.

थायरॉइडच्या समस्येमध्ये प्रोसेस्ड फूड खाऊ नये.

गहू प्रत्येक घरात खाल्ला जातो. पण थायरॉईड रुग्णांसाठी हा घातक आहे.

## पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी पी.व्ही.सिंधू फॉर्ममध्ये; मलेशिया मास्टर्स स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक



नवी दिल्ली : 26 जुलै 2024 पासून सुरु होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी भारतीय क्रीडाप्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आहे. या स्पर्धेपूर्वी 2 ऑलिम्पिक विजेती भारताची बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू ही चांगल्या फॉर्ममध्ये आली आहे. तिने क्वालालंपूर येथे होत असलेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीची उपांत्य फेरी गाठली आहे. तिने उपांत्य पूर्व फेरीमध्ये जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेल्या हान यूचा सलग तीन गेममध्ये पराभव करत उपांत्य फेरी गाठली. गेल्या काही महिन्यांमध्ये दुखापतींमुळे त्रस्त असलेल्या सिंधूने जोरदार पुनरागमन केले आहे. त्यामुळे आगामी पॅरिस ऑलिम्पिकच्या दृष्टीने ही भारतीयांसाठी आनंदाची बाब आहे. (PV Sindhu stuns top seed Han Yue to enter Malaysia Masters semi final)

गेल्या सात महिन्यांमध्ये सिंधूने पहिल्यांदा उपांत्य फेरी गाठली आहे. सिंधूने हान यूचा 21-13, 14-21 आणि 21-12 अशा सेट्समध्ये पराभव केला. "तिसरा गेम हा आम्हा दोघांसाठी महत्त्वाचा होता. पहिल्या गेमपासूनच मी स्वतःचे लक्ष गेममध्ये केंद्रित केले होते, कुठेही सोपे गुण दिले नाहीत. मी नियंत्रणात होते आणि मला जिंकण्याचा आत्मविश्वास होता. मागील सामना गमावल्यामुळे, हा सामना मी जिंकला याचा मला आनंद आहे." अशा भावना तिने व्यक्त केल्या. ती पुढे म्हणाली की, "स्पर्धेच्या या स्टेजवर असताना एवढा सहज विजय मिळेल, अशी अपेक्षा मला नव्हती. मी अवघड परिस्थितींसाठीही तय्यार होते.

# पुष्कर जोगने मराठी इंडस्ट्रीबद्दल मांडलं स्पष्ट मत



'जबरदस्त' चित्रपटामुळे अभिनेता पुष्कर जोग घराघरांत लोकप्रिय झाला. आजवर त्याने अनेक चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. 'बिग बॉस'मराठी या शोमुळे पुष्करला खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळाली. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'मुसाफिरा' चित्रपटाच्या माध्यमातून पुष्कर एक निर्माता आणि दिग्दर्शक म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला आला. यादरम्यान त्याने अनेकदा मराठी चित्रपटांना ऑस्करमध्ये स्थान द्यायची इच्छा बोलून दाखवली होती. नुकतीच त्याने भार्गवी चिरमुलेच्या गप्पा मस्ती पॉडकास्टमध्ये उपस्थिती लावली होती. यावेळी पुष्करने अनेक विषयांवर आपलं स्पष्ट मत मांडलं.

मराठी इंडस्ट्रीबद्दल बोलताना पुष्कर म्हणाला, "अनेकजण मला म्हणतात तू 'मुसाफिरा', 'धर्मा AI' अशा धाटणीचे चित्रपट का करतोस? पण, मला अशाचप्रकारचे चित्रपट करायला आवडतात. मला माझ्या मराठी चित्रपटांना खूप मोठं झालेलं बघायचंय. माझ्या मराठी चित्रपटांसाठी मला राष्ट्रीय पुरस्कार जिंकायचे आहेत. मला ऑस्करमध्ये जाऊन मराठी बोलायचंय. तिथे मला 'जय हिंद जय महाराष्ट्र' म्हणायचं आहे आणि मी हे करून दाखवणार! हा माझा माज नाहीये...ही तळमळ... माझ्या मनातली एक इच्छा आहे. आज माझ्याकडे जे काही आहे ते सगळं माझ्या मराठी चाहत्यांमुळे आहे. मी हे सगळं बोलताना नेहमीच भावुक होतो पण, हाच माझा स्वभाव आहे."

इंडस्ट्रीबद्दल सांगताना पुष्कर पुढे म्हणाला, "मराठी इंडस्ट्रीमध्ये अजिबात एकजूट नाही. एका मराठी माणसाचं चांगलं झालेलं दुसऱ्याला आवडत नाही. आज आपल्याच इंडस्ट्रीत जे लोक म्हणतात ना... मराठीसाठी हे आणि मराठीसाठी ते... हेच लोक सगळ्यात जास्त ग्रुपिंग आणि लॉबिंग करतात. याला काम नाही द्यायचं असं ठरवतात. पण, एखाद्याला काम का नाही द्यायचं? या सगळ्या समस्या आहेत. मला कोणाचीही साथ नाही, पण मी आपल्या चित्रपटांसाठी नक्की मेहनत करणार...आज माझं वय ३८ आहे. अजून माझ्याकडे १२ वर्षे आहेत. या पुढच्या १२ वर्षांत मला राष्ट्रीय पुरस्कार आणि माझ्या मराठी चित्रपटासाठी ऑस्कर पुरस्कार जिंकायचाय अशी माझी मनापासून इच्छा आहे. हा अतिआत्मविश्वास किंवा माज अजिबातच नाही."

"आपली मराठी इंडस्ट्री खऱ्या अर्थाने एकत्र आली तर, बाकीच्या कोणत्याच इंडस्ट्री राहणार नाहीत. कारण, आपल्यासारखं टॅलेंट कुठेच नाही. प्रत्येकजण इथे भारी काम करतंय पण, युनिटी नाही. पण, इथे काय होतंय चित्रपट प्रदर्शित होण्याआधी आपण एकमेकांना फोन करत नाही. सारख्या तारखांना चित्रपट प्रदर्शित करतो, एकमेकांसाठी कधीच पोस्ट करत नाही. यामुळे बॉलीवूडमध्ये मराठी कलाकारांना पाण्यात बघितलं जातं. माझ्या इंडस्ट्रीबद्दल मी नेहमीच तळमळीने बोलत असतो. जोपर्यंत आपल्यात एकजूट होणार नाही तोपर्यंत काहीच होऊ शकत नाही." असं स्पष्ट मत पुष्कर जोगने मांडलं आहे.

# उलट्या झाल्यावर लगेच दात घासावेत का?



दैनंदिन कामांमध्ये आपण जेवढे लक्ष आपल्या शारीरिक स्वच्छतेकडे देतो, तितके आपण आपल्या ओरल हेल्थकडे देत नाही. मात्र, हेदेखील शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे. तोंड आणि दातांची स्वच्छता आरोग्याच्या दृष्टीनं महत्त्वाची आहे. दात स्वच्छ असतील, तर आपण अनेक आजार दूर ठेवू शकतो. त्यामुळे दररोज दात घासणं, तोंड धुणं आवश्यक आहे. साधारणपणे तोंडात सामान्य बॅक्टेरिया असल्यास किंवा तोंडाची साफसफाई योग्य प्रकारे न केल्यास तोंडातून दुर्गंधी येऊ लागते. पण, उलट्या झाल्यानंतर दात घासावे की नाही, याच विषयावर तज्ज्ञांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.

तज्ज्ञांच्या मते, जर तुम्ही उलटी झाल्यानंतर लगेच ब्रश करणे निवडले तर तुमच्या दातांवरील सर्वांत बाहेरचा थर पोटातील आम्लयुक्त घटकांमुळे झिजून जाऊ शकतो. उलट्या झाल्यानंतर दात घासू नयेत हे जाणून अनेकांना आश्चर्य वाटते. यामागील कारण असे आहे की, पोटातून निघणारे आम्ल दातांच्या बाहेरील थराला मऊ करते, ज्यामुळे ते टूथब्रशने घासले जाण्याची शक्यता असते .

उलटीमध्ये न पचलेले अन्न आणि आपल्या पोटातून तयार होणाऱ्या ॲसिडचा समावेश होतो, जे अन्न पचण्यास मदत करते. यामुळे ते अम्लीय होते. एकदा उलटी झाली की तोंड आणि घशातील वातावरण आम्लयुक्त बनते. अशा वेळी जर आपण दात घासले तर एक गोष्ट घडू शकते की, मुलामा चढवणे आधीच कमकुवत अवस्थेत असल्याने ते सहजपणे दूर होऊ शकते.

इनॅमल हे दातांच्या पृष्ठभागावर कॅल्शियमचे आवरण आहे; ते ॲसिडसह बंद होऊ शकते. त्यामुळे उलट्या झाल्यानंतर तुम्ही आदर्शपणे अम्लीय pH तटस्थ होण्याची प्रतीक्षा करावी, ज्याला साधारणपणे ३० ते ४५ मिनिटे लागतात.

खरंतर तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, तुम्हाला उलट्या झाल्यानंतर लगेच दात घासू नका. आपण दात घासण्यापूर्वी सुमारे ३० मिनिटे प्रतीक्षा करणे केव्हाही चांगले आहे. दात घासण्यापूर्वी ३०-४५ मिनिटे वाट पाहण्यावर ब्रश करणे सुरक्षित आहे.

## दिनविशेष

**घटना**

२०२२: गीतांजली श्री - लिखित रेत समाधी या पुस्तकाच्या इंग्रजी भाषांतरित टॉम्ब ऑफ सँड (Tomb of Sand) पुस्तकासाठी २०२२ चा आंतरराष्ट्रीय बुकर पुरस्कार मिळाला.

२०१४: नरेंद्र मोदी यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतली.

१९९९: श्रीहरिकोटा येथून पी. एस. एल. व्ही. सी. २ या ध्रुवीय उपग्रहवाहकाने भारताचा आय. एस. एस. पी. ४ ( ओशनसॅट), कोरियाचा

किटसॅट व जर्मनीचा डी. एल. आर. टबसॅट या तीन उपग्रहांना त्यांच्या कक्षेत यशस्वीरीत्या पोहोचवले.

१९८९: मुंबईजवळच्या न्हावा शेवा बंदराचे उदघाटन झाले.

१९७१: बांगलादेश मुक्तिसंग्राम - बांगलादेशातील सिल्हेटमधील बुरुंगा येथे पाकिस्तानी लष्कराने किमान ७१ हिंदूंची कत्तल केली. १८९६: निकोलस (दुसरा) - रशियाचा झार बनला.

**जन्म**

१९६६: झोला बड - दक्षिण अफ्रिकेची धावपटू

१९६१: तारसेम सिंग - भारतीय-अमेरिकन दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक १९५६: ज्योती गोगटे - भारतीय शिक्षणतज्ज्ञ

१९५१: सॅली राइड - पहिल्या अमेरिकन महिला अंतराळवीर (निधन: २३ जुलै २०१२) १९४५: विलासराव देशमुख - महाराष्ट्राचे १४वे मुख्यमंत्री (निधन : १४ ऑगस्ट २०१२) १९३८ : के. बिक्रम सिंग भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते ( निधन : १२ मे २०१३)

१९३७ : मनोरमा - भारतीय अभिनेत्री आणि गायिका पद्मश्री (निधन : १० ऑक्टोबर २०१५)

१९३०: करीम इमामी - भारतीय - ईराणी लेखक आणि समीक्षक (निधन: ९ जुलै २००५)

१९०६: बेन्जामिन पिअरी पाल - आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय कृषी संशोधक (निधन: १४ सप्टेंबर १९८९)

**निधन**

२०११ : रजनीकांत आरोळे- जामखेड मॉडेलचे जनक - पद्म भूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार (जन्म: १० जुलै १९३४) २००० : प्रभाकर शिरूर चित्रकार

१९०८: मिर्झा गुलाम अहमद - भारतीय धर्मगुरू, अहमदिया चळवळीचे संस्थापक (जन्म: १३ फेब्रुवारी १८३५)

१९०२: अल्पोन स्ट्राउजर - अमेरिकन संशोधक (जन्म: ११ फेब्रुवारी १८३९)

## राशि भविष्य

**मेष** एक लक्षात ठेवा वादविवाद चर्चांमधून काहीही हाती लागत नाही, तर काहीतरी हरवतेच. मालमत्ताविषयक कामे होतील आणि उत्तमपैकी नफा होईल. तुमच्या कुटुंबातील सदस्य सांगतील ते तुम्हाला काहीच मान्य होणार नाही - परंतु त्यांच्या अनुभवातून काहीतरी शिका.

**वृषभ** काही टाळता न येण्याजोग्या घटनांमुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. परंतु तुम्ही भांबावून न जाता आणि त्यावर घाईघाईने प्रतिक्रिया न देता शांतपणे परिस्थिती हाताळा. या राशीतील विवाहित जातकांना आज सासरच्या पक्षाकडून धन लाभ होण्याची शक्यता आहे. जीवनसाथीचे आरोग्यामुळे तुम्हाला काळजी वाटेल.

**मिथुन** तुम्ही जीवनात पैश्याची किंमत समजत नाही परंतु, आज तुम्हाला पैश्याची किंमत समजू शकते कारण, आज तुम्हाला पैश्याची अत्यंत आवश्यकता असेल परंतु तुमच्याकडे पर्याप्त धन नसेल. मित्र आणि अनोळखी यांच्यातील फरक ओळखण्याची सावधनता बाळगा.

**कर्क** आपला मूड बदलण्यासाठी एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी व्हा. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला गरजेच्या वस्तूंच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील. कुटुंबाची आघाडी आनंदी आणि सुरळीत असणार नाही. प्रणयराधना करण्याची भावना जोडिदाराकडून आज अनुभवता येईल.

**सिंह** दीर्घ आजाराशी लढा देताना स्वतःवरचा विश्वास हाच तुम्हाला हिरो ठरवू शकतो, हे ओळखा. पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. नोतवाईक व मित्रमंडळींकडून अनपेक्षित भेटवस्तू मिळतील.

**कन्या** आपल्या उदार वागण्याचा फायदा मित्रमैत्रणींना घेऊ देऊ नका. तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल - कारण तुमचे प्रियजन तुमच्यासाठी आनंद निर्माण करतील. घरातील लहान सदस्यांसोबत आज तुम्ही पार्क किंवा शॉपिंग मॉल मध्ये जाऊ शकतात.

**तूळ** तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी होणे हे कधी कधी समस्येत टाकू शकते. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला तुमची प्रलंबित देणी आणि बिले देण्यास उपयोगी पडतील. मुलांमुळे आजचा दिवस खूप कठीण होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** शारीरिक सुदृढतेसाठी विशेषतः मानसिकदृष्ट्या कणखर बनण्यासाठी ध्यानधारणा आणि योगासने करा. भाऊ बहिणींच्या मदतीने आज तुम्हाला आर्थिक लाभ मिळू शकेल. भाऊ बहिणीचा सल्ला घ्या. संध्याकाळी अचानक पाहुणे आल्याने घरात गर्दी होईल.

**धनु** खेळ आणि आऊटडोअर ॲक्टीव्हिटीमधील सहभाग तुमचा हरवलेला उत्साह ऊर्जा परत मिळविण्यास सहाय्यभूत ठरेल. आपली सांपत्तिक स्थिती सुधारली असली, तरी खर्चाचे प्रमाण वाढतच असल्यामुळे तुमच्या योजना राबविण्यात अडचणी निर्माण करेल. वडिलांकडून मिळणारी कठोर वागणूक तुम्हाला दुःख पोहोचवू शकते.

**मकर** कोणत्याही प्रकारे तुमची ताकद कमी पडतेय असे नाही तर तुमची इच्छाशक्ती कमी पडतेय. तुमची खऱ्या क्षमता काय आहेत ते ओळखा. ज्या लोकांनी कुणी अनोळखी व्यक्तीच्या सल्ल्यावर काही धन गुंतवणूक केली होती आज त्यांना त्या गुंतवणुकीचा फायदा होण्याची पूर्ण शक्यता आहे.

**कुंभ** काही अटकळी आणि अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल. तुमच्या जीवनाला एक चांगला छान ताल येऊदा, त्यागाची आत्मसमर्पणाची किंमत जाणून घ्या आणि हृदयात प्रेम आणि कृतज्ञता बाळगून मार्गक्रमण करा. त्यामुळे आपले कौटुंबिक आयुष्य अधिक अर्थपूर्ण होईल. प्रेमप्रकरणामध्ये गुलामासारखे वागू नका.

**मीन** प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. पैसे मिळविण्याचा नव्या संधी लाभदायक असतील. कुटुंबातील सदस्यांची मदत तुमच्या गरजा पु-या करण्याची काळजी घेईल. तुम्ही आयुष्यभर प्रेम केलेत तर तुमच्या प्रिय व्यक्तीशी तुम्ही व्यक्तिमत्व सुधारण्यावर केलेल्या प्रयत्नांचे समाधानकारक फळ मिळेल.

# महाड तालुक्यात चालू वर्षी दरडीचा धोका कायम! ७२ गावांना दरडीचा धोका कायम, हजारो नागरिक स्थलांतराच्या प्रतीक्षेत, महसूल विभाग मात्र सुस्त!

● महाड - सह्याद्रीच्या पर्वतरांगांमुळे महाड तालुक्यात मोठ्या प्रमाणात डोंगराळ भाग असून तालुक्याचा 80 टक्के भाग डोंगराच्या पायथ्याशी आणि दऱ्या खोऱ्यात वसलेला आहे. २००५ मध्ये महाड तालुक्यात मोठ्या प्रमाणात दरड कोसळून शेकडो लोकांना जीव गमवावे लागले होते तेव्हा पासून सातत्याने १८ वर्ष पावसाळयात दरडीचा धोका महाड तालुक्यातील ग्रामीण भागातील व डोंगर खोऱ्यातील गावांना कायम आहे मात्र प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाय योजना अद्याप करण्यात आली नाही पावसाळा चालू होण्यास केवळ आठ दिवसाचा आवडी असताना महसूल खाते मात्र सुस्त झोपी गेल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे.

मागील वर्षी महाड तालुक्याला पर्जन्यवृष्टीचा फटका बसला. होता त्याचीच पुनरावृत्ती या वर्षी देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही महाड तालुक्यातील ७२ गावातील हजारो नागरिकांना दरड प्रवण क्षेत्रामधून भूस्खलन होण्याच्या शक्यतेने स्थलांतरित करावे लागणार असल्याची माहिती महाड महसूल विभागा कडून देण्यात आली. महाड तालुक्यातील बहुतांशी गावे ही दुर्गम व डोंगराळ भागात तीव्र उताराच्या जागेवर आहेत तर कांही गावे डोंगराला लागूनच पायथ्याशी. वसलेली आहेत.

महाड तालुक्या त दरवर्षी पर्जन्यमान 3000 ते साडेतीन हजार मिलिमीटर एवढ्या मोठ्या प्रमाणात महाड तालुक्यात पाऊस पडतो. महाड तालुक्यात जून जुलै ऑगस्ट या तीन महिन्याच्या काळात मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असल्याने जमिनीवर मोठ्या प्रमाणात नैसर्गिक बदल होतात तर काही ठिकाणी मानवी हस्तक्षेपामुळे भूपृष्ठावर बदल झालेले आहेत. महाड तालुक्यातील संभाव्य दरडग्रस्त गावातील नागरिकांना व प्रशासनाला देखील येत्या पावसाळयात नैसर्गिक आव्हानाचा सामना करावा लागणार आहे, मात्र शासनाकडे संभाव्य दरडग्रस्त भागात भूस्खलन होईल किंवा तो भाग पावसाच्या पाण्यामुळे खचेल अशी पूर्व संदेश देणारी किंवा संकेत देणारी यंत्रणा विकसित नसल्याने दुर्गम व डोंगराळ भागात अतिवृष्टी कशाप्रकारे होते. यावरच सर्व काही अवलंबून आहे.



महाड तालुक्यातील दरड प्रवण ग्रस्त भागातील नागरिकांचा जीव वेशीला टांगला असल्याचे चित्र दरड प्रवण ग्रस्त भागातील गावांमध्ये फेरफटका मारल्यावर पाहण्यास मिळाले. महाड तालुक्यातील ७२ गावातील हजारो बाधित कुटुंबातील नागरिकांना स्थलांतरित करावे लागणार आहे. त्या गावांची नावे पुढील प्रमाणे; लोअर तुडील, नामावले कोंड, शिंगरकोंड मोरेवाडी, आंबिवली पातेरीवाडी, कोंडीवते मूळ गावठाण,सव, सोनघर, जुई बुद्रुक,चांढवे खुर्द, रोहन, वलंग, कोथेरी जंगमवाडी,माझेरी,पारमाची वाडी, कुंबळे, कोसबी,वामने, चिंभावे बौद्धवाडी,वराठी बौद्धवाडी, चोचिंदे,चोचिंदे कोंड, गोठे बुद्रुक,आदिस्ते,खैरे तर्फे तुडील, कुर्ला दंड वाडी, रावतळी मानेचीधार, मोहोत सुतारवाडी,मांडले,, पिंपळकोंड, मुमुर्शी आंब्याचा कोंड, मुमुर्शी गावठाण,मुमुर्शी बौद्धवाडी,वीर गाव, वीर मराठवाडी, टोळ बुद्रुक,दासगाव भोईवाडा,तळोशी,बिरवाडी वेरखोले,करंजखोल,नडगाव काळभैरव नगर,पुनाडेवाडी,पाचाडवाडी,सांदोशी हेटकर कोंड, शेलटोळी,अंबेशिवथर,वाळण बुद्रुक,नामे नाची,कोंडीवते नवीन,हिरकणी वाडी, पाचाड परडी वाडी,वाघेरी आदिवासी वाडी,कोथेरी तांदळेकर वाडी, करंजाडी म्हस्के कोंड, नातोंडी धारेची वाडी, गोंडाळे, खर्डी,पांगारी मनवेधार, वरंध पोकळे वाडी,वरंध बौद्धवाडी,आड्राई,वाळण झोळीचा कोंड,वाळण केतकीचा कोंड,भीवघर,पिंपळवाडी, रुपवली, निगडे,बारसगाव, कोथेरी,ओवळे ,खरवली, तळीये असून या ७२ गावातील हजारो नागरिकांना निवारा शेडमध्ये तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करावे लागणार आहे.

सन२००५ नंतर महाड तालुक्यात दरडीचा धोका कायमच आहे.भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने केलेल्या सर्वे नुसार यंदा संभाव्य धोका असलेली ७२ गावे आहेत. दोन वर्षांपूर्वी झालेल्या तळी ये गावची दुर्घटना पहिली तर डोंगर भागात असलेल्या संभाव्य बहात्तर गावांपैकी कोणत्याही गावात भूस्खलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे या गावांच्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करणे गरजेचे आहे.

महाड तालुक्यात आपत्ती निवारण यंत्रणेमार्फत मार्फत . मागील १८ वर्ष फक्त पावसाळा पूर्वी दरडीचा धोका असलेल्या गावांना नोटिसा बाजावण्या व्यतिरिक्त कोणतीच ठोस उपाययोजना केली गेली नाहीत .त्या मुळे महाड तालुक्यातील दरडग्रस्त गावे आजही धोकादायक स्थितीत कायम आहेत.आजची परिस्थिती पहिली तर १० मे पासूनच पावसाळा सुरवात झाली आहे जरी अवकाळी लागत असला तरी पावसाळयात पर्जन्यमान होते त्या प्रमाणे पाऊस पडत आहे.

शासकीय पातळीवर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संभाव्य भूस्खलन आणि पुराची शक्यता लक्षात घेवून स्थानिक नागरिकांना स्थलांतर करणे, स्थलांतर करण्यासाठी निवारा व्यवस्था, महाड शहरात पूरपरीस्थिती लागणारी बचाव यंत्रणा, संपर्क साधनांची उपाययोजना, बोटींची व्यवस्था पूरपरिस्थितीत दूरध्वनी यंत्रणा कोलमडते अशा वेळी मोबाईल यंत्रणा देखील काम करत नाही याकरिता वॉकी टॉकी यंत्रणा देखील अद्याप सज्ज केलेल्या नाहीत संभाव्य दरडग्रस्त व पूर परिस्थिती बाबत निर्माण होणाऱ्या धोकादायक स्थिती वर मात करण्या साठी कोणतीच तयारी करण्यात आलेली दिसून येत नाही.संभाव्य दरड ग्रस्थ गावांना सुमारे 18 वर्ष खबरदारी च्या उपाययोजना म्हणून नोटीस बजावल्या जातात त्या देखील अध्याप बाजवण्यात आलेल्या नाहीत.

महाड तालुक्यातील महसूल यंत्रणा व आपत्ती निवारण यंत्रणा निवडणुकीच्या कामात मशगुल झाली आहे मात्र पावसाळा तोंडावर आला असताना शासकीय अधिकारी देखील सुस्त झोपी गेले आहेत. संभाव्य दरड ग्रस्थ गावातील नागरिकांना खबरदारी .करिता व सोपस्कार पार पाडावे म्हणून नोटिसा या महिन्याच्या शेवटी बाजवण्यात येतील. धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास शाळा ,समाजमंदिर,मंदिर,अंगणवाडी अशाठिकाणी या नागरिकांची ठेवण्याची व्यवस्था करण्यात येईल असे महाडचे निवासी नायक तहसीलदार बी वाय भाबड, यांनी सांगितले.

## महाड तालुक्यातील संभाव्य भूस्खलनाला तलाठी मंडळ अधिकारी नायब तहसीलदार जबाबदार!

■ महाड तालुक्यात मागील दहा वर्षात जेवढे उत्खनन झाले नाही तेवढे उत्खनन चालू वर्षी विकासाच्या नावाखाली फार्म हाऊस व खाजगी विकासाकांनी प्लॉट पाडण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर केले आहे त्यामध्ये करोडो रुपयांची रॉयल्टी तलाठी व मंडळ अधिकारी यांनी बुडवून लाखो रुपयांची माया जमा केली आहे या भ्रष्टाचारी तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम नायब तहसीलदार भाबड यांनी केल्याची चर्चा महसूल कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ऐकण्यास मिळत आहे महाड तालुक्यात तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर उत्खनन होत असताना बुडवलेल्या रॉयल्टीची व महसुलाची तहसीलदार महेश शितोळे व विभागीय दंडाधिकारी (प्रांत) ज्ञानोबा बानापुरे हे वसुली करणार का असा सवाल महाड तालुक्यातील नागरिक राज्याच्या प्रशासनाला व जिल्हाधिकारी जावळे यांना विचारत आहे महाड तालुक्यातील मंडळ अधिकारी व तलाठी यांनी मोठ्या प्रमाणावर उत्खनन होत असताना लाखो रुपयाचा शासकीय महसूल बुडून स्वतःचे खिसे भरण्याचे काम केल्याची चर्चा तहसीलदार कार्यालयात ऐकण्यास मिळत आहे महाड तालुक्यात तहसीलदार व मंडळ अधिकाऱ्यांनी बुडवलेल्या लाखो रुपयांची रॉयल्टी महसुलाची चौकशी होणार का असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे

## दुष्काळ - आचार संहितेचे बहाणे न करता, तातडीने उपाययोजना करा- नाना पटोले



● मुंबई - राज्यात दुष्काळाची स्थिती अत्यंत गंभीर आहे, काही गावांना महिना महिना पाणी मिळत नाही, जनावरांना चारा नाही, पिण्याचे पाणी नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये दुष्काळ आढावा बैठक घेतली पण या बैठकीला ५ पालकमंत्री गैरहजर होते यातूनच सरकार दुष्काळावर गंभीर नाही हे स्पष्ट दिसते. मुख्यमंत्र्यांनी जागेवरच आदेश द्यायला पाहिजे होते पण केवळ बैठकीचा सोपस्कार पूर्ण केला. सरकारने आचार संहितेचे बहाणे करुन टाळाटाळ करू नये, तातडीने जनावरांना चारा, पिण्याचे पाणी व लोकांच्या हाताला काम उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

पटोले पुढे म्हणाले की, राज्यातील सरकार हे असंवैधानिक आहे, या सरकारला सर्वसामान्य जनतेचे काहीही देणेघेणे नाही. गरीब लोकांचे जीव जात आहेत पण त्याकडे सरकारचे लक्ष नाही. दुष्काळाने जनता होरपळत आहे पण सरकार काहीही उपाययोजना करत नाही. पुण्यात धनदांडग्याच्या मुलाने गरिबाच्या दोघांना चिरडले तर निबंध लिहून त्याला सोडून दिले. डोंबिवलीत रासायनिक कारखान्यात स्फोट होऊन ११ लोकांचा मृत्यू झाला व ६० जण जखमी झाले. डोंबवलीत यापूर्वी झालेल्या एका घटनेनंतर महाविकास आघाडी सरकारने हे कारखाने बंद करण्याचे आदेश दिले होते पण त्यानंतर आलेल्या युती सरकारने पैसे घेऊन ते कारखाने सुरुच ठेवले. लोकांच्या जिविताचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची आहे पण खोके सरकारला गरिबांच्या जीवाचे मोल नाही, जनाची नाही मनाची असेल तर शिंदे-भाजपा सरकारने राजीनामा देऊन मोकळे व्हावे, असे पटोले म्हणाले.

नवीन अभ्यासक्रमासंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना अभ्यासक्रमात जर मनुस्मृतीचा समावेश केला तरकाँग्रेस ते कदापी खपवून घेणार नाही असा ईशारा पटोले यांनी दिला आहे.

## Couple arrested for killing their toddler, disposing of his body in Nullah



● Mumbai - The Meghwadi police on Friday arrested a 28-year-old man and his wife for allegedly killing their one-and-a-half-year-old son and disposing of the body in an open drain in Goregaon. The police said that the accused had tried to mislead them by claiming that their son had been kidnapped. However, during the course of the investigation, it came to light that they had beaten the toddler to death.

According to police officials, the two arrested have been identified as Rajesh Rana (28) and Rinki Rana (23). They lived with their son Aman in Jogeshwari East.

Rajesh reported the matter to Meghwadi police late on May 21, alleging that his son had been kidnapped by two men. "He claimed that the two men forced the toddler to inhale something, causing him to fall unconscious, and then escaped in an auto rickshaw," said an officer.

The police initiated a probe, scrutinising CCTV footage. As the investigation progressed, the police realised that Rana was misleading them. "We then took him into custody and interrogated him. During questioning, he alleged that while taking his son to play, his son fell and sustained a head injury, resulting in his death," said an officer. "Rana further told us that he got scared and disposed of the body in a nullah at Goregaon."

The police retrieved the body and conducted a post-mortem on the child. Doctors informed the police that the toddler had died due to multiple injuries to his body.

"Rana was questioned again, after which he revealed that Aman(the son) was born from Rinki's first marriage. The accused had disdain for the boy as such and the couple constantly fought over the child," added an investigator.

Festive offer

The Meghwadi police later took Rinki into custody, who corroborated Rana's story. Rana and Rinki were arrested under relevant sections for murder, destruction of evidence, and conspiracy.

## Mob vandalises speeding car that hit and injured 3 in Nagpur



● New Delhi - A mob vandalised a car in Nagpur late on Friday after it hit three persons, including a child, in the Zenda Chowk area of Kotwali police limits on Friday.

The police said that it has detained three people, including the driver, accusing him of rash driving, news agency ANI reported.

"A woman, her child and another person were injured after a speeding car hit them around 8:30 pm at Zenda Chowk area of Kotwali Police Station. People caught one of the accused. Police detained 3 youths and the car driver in connection with the case. Liquor bottles and narcotic substances were seized from the car. Medical tests of the accused being conducted and a case is being registered," ANI quoted Gora k h Bhamre, DCP, Nagpur Police, as saying.

This comes days after a 17-year-old crashed his Porsche into a motorcycle in Pune, killing tow professionals. The accused juvenile was earlier granted bail by the court, sparking a huge uproar by local residents. Maharashtra Deputy Chief Minister Devendra Fadnavis, who also handles the Home Department, had also expressed shock at the "extremely lenient" manner in which bail was granted.

## Pune Porsche case: Grandfather of minor arrested on charges of kidnapping, wrongful confinement of driver




● Pune - The Pune city police on Saturday arrested the grandfather of the minor boy who was apprehended for allegedly driving a Porsche car at high speed and killing two software engineers in the city on May 19. The minor's grandfather, a top realtor in Pune, was arrested on charges of kidnapping and wrongful confinement following a complaint by the man employed to drive the Porsche car.

Pune City Police Commissioner Amitesh Kumar confirmed the arrest.

According to the first information report lodged at the Yerawada police station early on Saturday morning, the 42-year-old driver said that he was returning home from the police station on the intervening night of May 19 and May 20 when the minor's grandfather allegedly forced him to sit in a BMW car.

The grandfather allegedly took the driver to their bungalow where he and the father of the minor boy allegedly snatched the driver's mobile phone and confined him. The grandfather and father of the minor boy then allegedly asked the complainant driver to take the blame for the Porsche car accident, the FIR stated.

The minor's father who is in judicial custody has also been booked in this case. The FIR lodged on Saturday is the third one related to the accident that took place early on May 19 when two IT engineers were killed after a speeding Porsche car without any number plates hit their motorcycle at the Kalyani Nagar junction.

The minor, who was initially granted bail on the same day by the Juvenile Justice Board (JJB), was later sent to an observation home till June 5 by the board upon the police's request.

On Friday, police chief Amitesh Kumar had said that after the accident, there was some attempt by the minor's father to show that it was the driver and not his son who was behind the wheels of the Porsche car at the time of the accident. "So we are exploring the option of applying Section 201 of the Indian Penal Code for destroying evidence," he had said.

Kumar also said that the driver had initially said that he was driving the Porsche car and a probe was on to see if he made the statement under pressure. The police are now probing if the minor's grandfather played any role in pressuring the driver to falsely claim that he was driving the car.

The police also claimed to have checked the records at the security cabin of the minor's residence, which allegedly showed that he had taken the car while leaving the house. The police have also seized the CCTV footage from the minor's house.

Meanwhile, based on information obtained from the minor boy, the police lodged the second FIR on May 20 against his father and six others, including the owner and managers of two restaurants in Pune city where liquor was allegedly served to the minor boy and his friends before the accident. The police also arrested the minor's father for allegedly giving him a car without number plates and money despite knowing that he drinks and was a minor without a driving licence. In this offence, the police also arrested five employees of the two restaurants, for serving liquor to the minor boy. The police booked them under sections 75 and 77 of the Juvenile Justice Act and sections of the Motor Vehicles Act (MVA). The police further invoked Section 420 of IPC against the minor's father for allegedly cheating the government by non-payment of fees of Rs 1,759 at the Pune RTO for registration of the Porsche car. The police also invoked Section 5/180 of MVA and Section 65(e) of the Maharashtra Prohibition Act in this case. A special court remanded the minor's father and five personnel of two restaurants to judicial custody till June 7.

## थोडक्यात



### नर्सिंग अभ्यासक्रमाच्या सीईटीसाठी ५८ हजार अर्ज

● मुंबई , प्रतिनिधी :

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या सीईटी परीक्षेसाठी राज्यभरातून तब्बल ५८ हजार अर्ज आले आहेत. यामध्ये सर्वाधिक अर्ज नागपूर, औरंगाबाद आणि लातूर या जिल्ह्यांतून आले आहेत.

बी. एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २८ मे २०२४ रोजी होणार आहे. बी. एस्सी. नर्सिंग हा इयत्ता बारावीनंतर (विज्ञान) ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. गतवर्षापासून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने एमएच- बी.एस्सी नर्सिंग सीईटी घेण्याचे निश्चित केले. गतवर्षी बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या सीईटी परीक्षेसाठी राज्यातून ३१ हजार ३९७ अर्ज आले होते. यंदा त्यामध्ये वाढ झाली असून, या वर्षी तब्बल ५८ हजार ६३५ अर्ज आले आहेत.

### तेजस गर्गेच्या मुंबईतील घराची तपासणी



● नाशिक, प्रतिनिधी :

ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी पुरातत्व व वस्तुसंग्रहालय विभागाचे तत्कालीन संचालक तेजस गर्गे आणि सहायक संचालिका आरती आळे यांची नावे लाच प्रकरणात आली. या प्रकरणआस १५ दिवसांचा कालावधी उलटूनही गर्गे अद्याप फरार आहे. मुंबई येथील त्यांच्या घराची तपासणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली असता तीन लाख १८ हजार रुपये रोख आणि अन्य काही सामान सापडले आहे. गर्गे १५ दिवसांपासून फरार आहेत. न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. बुधवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने गर्गे यांच्या मुंबई येथील घराची तपासणी करण्यात आली.

यावेळी गर्गे यांच्या पत्नी उपस्थित होत्या. घरझडतीत पुणे, छत्रपती संभाजीनगर येथील बँक खाते, तसेच त्यांच्या पत्नीचे मुंबई येथील बँकेचे तपशील मिळून आले. तीन लाख १८ हजार रुपये रोख, तीन हार्डडिस्क, गर्गे व त्यांच्या पत्नीचे पारपत्र मिळाले आहे.

# मुंबईकरांनो पाणी जपून वापरा! ३० मे पासून ५ टक्के, तर ५ जून पासून १० टक्के पाणी कपात


● मुंबई , प्रतिनिधी :

मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमधील पाणीसाठ्यात घट झाल्याने, हा साठा अधिकाधिक काळ उपयोगात यावा यादृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून मुंबई महानगरात गुरूवार दिनांक ३० मे २०२४ पासून ५ टक्के पाणीकपात, तर बुधवार दिनांक ५ जून २०२४ पासून १० टक्के पाणीकपात लागू करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे.

मुंबईकर नागरिकांनी घाबरून जाण्याचे कोणतेही कारण नाही. मात्र सर्व नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन देखील बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. २०२१ आणि २०२२ या दोन वर्षात दिनांक १५ ऑक्टोबरपर्यंत मान्सून सक्रीय होता. मात्र २०२३ मध्ये ऑक्टोबर महिन्यात तुलनेने पाऊस झाला नाही. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदा धरण साठ्यामध्ये सुमारे ५.६४ टक्के पाणीसाठा कमी आहे. २५ मे २०२४ रोजीची आकडेवारी लक्षात घेता, मुंबईस पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमध्ये मिळून एकूण १ लाख ४० हजार २०२ दशलक्ष लीटर पाणीसाठा उपलब्ध आहे. वार्षिक १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लीटरच्या तुलनेत सध्या फक्त ९.६९ टक्के इतकाच उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. भातसा धरणातून १,३७,००० दशलक्ष लीटर तर अप्पर वैतरणा धरणातून ९१,१३० दशलक्ष लीटर अतिरिक्त पाणीसाठा मुंबईला मिळणार आहे. मुंबईसाठी पाणीसाठा उपलब्ध असून मुंबईकर नागरिकांनी घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे, यंदा मॉन्सूनचे वेळेवर आगमन होईल, असा हवामान खात्याने अंदाज वर्तविला आहे, ही देखील सकारात्मक बाब आहे, असे महापालिकेने म्हटले आहे.



- अलीकडे वाढलेले तापमान, पर्यायाने वाढणारे बाष्पीभवन आणि पाणीसाठा १० टक्केपेक्षा कमी झाल्यानंतर यापुढेही पाणीपुरवठा नियोजनपूर्वक करता यावा, या सर्वाचा विचार करून, खबरदारीचा उपाय म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने सदर पाणी कपात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ठाणे, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका व इतर गावांना जो पाणीपुरवठा केला जातो, त्यात देखील ही ५ टक्के आणि १० टक्के कपात लागू राहणार आहे.
- समाधानकारक पर्जन्यमान होऊन जलाशयांमधील उपयुक्त साठ्यामध्ये सुधारणा होईपर्यंत ही पाणी कपात लागू राहणार आहे.



● कर्नाटक, प्रतिनिधी :

## कर्नाटकात मध्यरात्री तरुणांच्या टोळक्यांचा नंगानाच

### तलवारींचे वार, एकमेकांच्या अंगावर घातल्या गाड्या!

पुण्यामध्ये एका गर्भश्रीमंत बिल्डरच्या मुलानं पोर्श कारने दोन जणांना उडवून त्यांचा जीव घेतल्याची घटना ताजी असतानाच नागपूरमध्येही मध्यरात्री मद्यधुंद अवस्थेत एका चालकानं तिघांना उडवल्याची घटना घडली आहे. या दोन घटनांवर सोशल मीडियापासून राजकीय वर्तुळापर्यंत सर्वत्र चिंता व्यक्त केली जात असतानाच कर्नाटकमधला एक भयानक व्हिडीओ सध्या व्हायरल होऊ लागला आहे. आठवड्यापूर्वी घडलेल्या या भीषण घटनेचा व्हिडीओ कर्नाटक भाजपानं त्यांच्या एक्स हँडलवर शेअर केला आहे. या व्हिडीओवरून आता राजकीय आरोप-प्रत्यारोपही होऊ लागले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना १८ मे रोजीच्या मध्यरात्री घडली. कर्नाटकच्या उडपी भागातील कुंजीबेट्टू परिसरात हा सगळा प्रकार घडला. कापू भागातील तरुणांच्या दोन टोळक्यांमधील वादाचं रुपांतर हाणामारीत आणि नंतर या भीषण प्रकारात झाल्यामुळे परिसरात दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे. उडपी-मणिपाल राष्ट्रीय महामार्गावरील या घटनेचा व्हिडीओ तिथल्याच एका इमारतीत राहणाऱ्या एका व्यक्तीनं शूट केला असून तोच सध्या व्हायरल होत आहे. या प्रकरणात पोलिसांनी आत्तापर्यंत दोन जणांना अटक केली आहे.

#### भाजपाची टीका

**या घटनेचा व्हायरल व्हिडीओ कर्नाटक भाजपानं त्यांच्या एक्स हँडलवर शेअर केला असून त्यासोबत लिहिलेल्या पोस्टमध्ये कर्नाटकमधील काँग्रेस सरकारला लक्ष्य केलं आहे. “कर्नाटक मॉडेल. गँगवॉर, बलात्कार, हल्ले, हत्या, बॉम्बस्फोट, गांजा, अफू, रेव्ह पार्ट्या, पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा हे सगळं कर्नाटकमधील काँग्रेस सरकारच्या काळात सामान्य झालं आहे”, अशी टीका भाजपानं केली आहे.**

## केरळमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा कहर

● केरळ, प्रतिनिधी :

मोसमी पाऊस ३१ मे रोजी केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवलेला आहे. मोसमी वाऱ्याच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती असल्यामुळे मोसमी पाऊस केरळमध्ये वेळेत दाखल होणार असल्याचे भारतीय हवामान विभागाने काही दिवसांपूर्वी म्हटले होते. त्यानंतर आता केरळमध्ये मान्सूनपूर्व पाऊस दाखल झाला असून पावसामुळे अनेक सेवा विस्कळीत झाल्या आहेत. तसेच केरळमधील दोन जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दक्षिण केरळवरील चक्रीवादळाच्या प्रभावाखाली केरळच्या किनारपट्टीपासून दक्षिणपूर्व अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने आयएमडीने पुढील



दोन दिवस केरळमध्ये अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवलेला आहे. केरळच्या अनेक भागात बुधवारी रात्रीपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. मान्सूनला अजून एक आठवडा बाकी आहे. मात्र, त्याआधीच केरळच्या अनेक भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. एर्नाकुलम आणि त्रिशूर जिल्ह्यांमध्ये बुधवारी रात्रीपासून पावसाने थैमान घातले आहे. केरळच्या इतर आठ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलेला आहे.

## ‘समृद्धी’वरून एक कोटी वाहनांची धाव

### ‘एमएसआरडीसी’ला पथकरातून ७२५ कोटी

● मुंबई , प्रतिनिधी :

नागपूर – मुंबई समृद्धी महामार्ग प्रकल्पातील शिर्डी – भरवीरदरम्यानचा ८० किमीचा टप्पा वाहतूक सेवेत दाखल झाल्यास, आज शनिवारी वर्ष पूर्ण झाले आहे. या एका वर्षात या महामार्गावरून एक कोटी वाहने धावली, तर पथकरापोटी ७२५ कोटी रुपयांचा महसूल मिळाला.

राज्याची राजधानी आणि उपराजधानीमधील अंतर कमी करण्यासाठी ‘एमएसआरडीसी’ने ७०१ किमीच्या समृद्धी महामार्गाचे बांधकाम हाती घेतले आहे. त्यातील ६२५ किमीचा मार्ग सेवेत दाखल झाला आहे. नागपूर – शिर्डी टप्पा डिसेंबर २०२२ मध्ये तर



शिर्डी – भरवीर टप्पा २५ मे २०२३ रोजी वाहतूक सेवेत दाखल झाला. तसेच भरवीर – इगतपूरीदरम्यानचा २५ किमीचा टप्पा मार्च २०२४ मध्ये वाहतूक सेवेत दाखल करण्यात आला आहे. अतिवेगवान प्रवासामुळे या महामार्गाला चांगला प्रतिसाद मिळाला. डिसेंबर २०२२ पासून २३ मे २०२४ पर्यंत या महामार्गावरून ९९ लाख ८० हजार वाहनांनी प्रवास केल्याची माहिती ‘एमएसआरडीसी’तील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

## २४ वर्षे जुन्या खटल्यात सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर दोषी

### दिल्लीच्या साकेत न्यायालयाचा निर्णय

● दिल्ली, प्रतिनिधी :

२४ वर्षे जुन्या खटल्यात सामाजिक कार्यकर्त्या आणि नर्मदा बचाव आंदोनलाच्या संस्थापक मेधा पाटकर यांना दिल्लीतल्या साकेत न्यायालयाने दोषी ठरवलं आहे. दिल्लीचे सध्याचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी मेधा पाटकर यांच्या विरोधात याचिका दाखल केली होती. मेधा पाटकर आणि व्ही. के. सक्सेना यांच्यात हा वाद मागच्या २४ वर्षांपासून सुरु आहे. आता मेधा पाटकर यांना साकेत न्यायालयाने दोषी ठरवलं आहे.

व्ही. के. सक्सेना हे अहमदाबादच्या नॅशन



कौन्सिल फॉर सिव्हिल लिबर्टीज या स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष असताना त्यांनी मेधा पाटकर आणि त्यांच्या नर्मदा बचाव आंदोलनाच्या विरोधात एक जाहिरात प्रसिद्ध केली होती. ही संस्था सरदार सरोवराच्या बाजूने होती. ज्यानंतर मेधा पाटकर यांनी सक्सेना यांच्याविरोधात खटला दाखल केला होता. तर सक्सेना यांनी यानंतर मेधा पाटकर यांच्याविरोधात अब्रू नुकसानीचा दावा केला होता. ज्या प्रकरणाचा निकाल शुक्रवारी लागला आहे आणि मेधा पाटकर यांना दोषी ठरवण्यात आलं आहे.

#### न्यायालयाने काय निरीक्षण नोंदवलं?


तक्रारदाराच्या प्रतिष्ठेला धक्का बसू शकतो याची जाणीव असूनही मेधा पाटकर यांनी जाहीररित्या आरोप केल्याचं स्पष्ट झालं असं साकेत न्यायालयाने म्हटलं आहे. तसंच मेधा पाटकर यांची कृती चुकीच्या हेतूने प्रेरित होती असंही म्हटलं आहे. मेधा पाटक यांनी सक्सेना यांना त्यावेळी देशभक्त नसलेला माणूस आणि पळपुटा असं म्हटलं होतं. तसंच हवाला गैरव्यवहारांमध्ये हात असल्याचाही आरोप केला होता. मेधा पाटकरांनी केलेले आरोप तक्रारदाराचा अपमान करणारे आणि त्याच्याबाबत नकारात्मक मत तयार करण्यासाठी जाणीवपूर्वक करण्यात आल्याचं दिसून येतं असंही निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं आहे.

## सातारा जिल्ह्यात जमीन मोजणीची प्रक्रिया ठरते तारीख पे तारीख

● सातारा, प्रतिनिधी :

सध्या सोन्या इतकाच भाव जमिनीला आल्यामुळे प्रत्येकाला'''''''' दो बिघा जमीन''''''''' शक्य नसले तरी''''''''' गुंठे पाटील''''' होण्यात मनस्वी आनंद वाटत आहे. पण, वारसदार व भावकी, हिस्सेदार वाढल्यामुळे आता बांधावरील वाद न्यायालयात गेले आहे कारण , जमीन वाढत नाही. अशा वेळेला आपल्या वाटणीची जमीन मोजणीसाठी अनेक जण भूमी अभिलेख कार्यालयात ऑफलाइन व ऑनलाईन पद्धतीने अर्ज करतात. सातारा जिल्ह्यातील भूमी अभिलेखा कार्यालयात अधिकारी कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे सातारा जिल्ह्यात किमान प्रत्येक गावातील पाच ते दहा मोजणी अर्ज प्रत्यक्षात शेतात जाऊन मोजणी करण्यास असमर्थ ठरलेले आहेत. त्यामुळे जमीन मोजणी म्हणजे तारीख पे तारीख असा आता खेळ सुरू झालेला आहे. याबाबत ना काही शेतकरी संघटनेचे लक्ष... ना लोकप्रतिनिधीला वेळ... ना याबाबत खुली चर्चा होताना दिसत आहेत.

सातारा जिल्ह्यात भूमि अभिलेख कार्यालय प्रत्येक तालुक्यात आहे. एकूण सातारा जिल्ह्याचे दहा हजार चारशे ऐंशी



चौरस किलोमीटर आहे. १७३९ खेडी व पंधरा शहरे आणि २२ खेडी ओसाड अशी जनगणना २००१ साली झाली होती. आता त्यामध्ये पंधरा पट वाढ झालेली आहे. या सर्वांची सॅटेलाईट असू अथवा ड्रोन च्या साह्याने कधीतरी मोजणी होईल. परंतु, तोपर्यंत अनेकांना शेतजमिनीच्या मोजणी अभावी न्यायालयात दिवाणी दावा खेळावा लागत आहे. या पाठशिवनीच्या खेळामध्ये इकडे तारीख पे तारीख आणि तिकडेही तारीख पे तारीख अशा पद्धतीने शेतकरी वर्गाची अवस्था झाली आहे.

ऑनलाइनच्या सातबारावर मूळ पुरुष व वारस हक्काने निर्माण झालेले वारसदार यांची जर आकडेवारी पाहिली तर एका सातबारा वर किमान २५ ते ५० वारसदार नोंदवावी लागत आहेत. तर मयत वारसदारांच्या नोंदी सुद्धा सापडत आहेत पुन्हा त्यांच्या वारसदारांची नावे लावली जात आहेत .शेत जमिनीचा खरेदी विक्री व्यवहार करताना मोजणी पासून ते दस्त घेण्यापर्यंत साठेखत, खुशखरेदी खत व इतर गोष्टींसाठी अगदी स्वतःच्या घरातले कार्य समजून अनेक जण झटत असतात. पण शेत जमिनींच्या मोजणी बाबत असा पाठपुरावा करण्यास कोणी पुढे येत नाही. त्यामुळे शेतकरी वर्गाला जमीन मोजणीसाठी ऑनलाईन अर्ज भरताना लॉगिन करताना दिलेला आय.डी. आणि पासवर्ड हा लक्षात ठेवावा लागत आहेत .विशेष बाब म्हणजे हा आयडी आणि पासवर्ड देणे हे शेतकऱ्यांच्या हाती नसून संबंधित कर्मचाऱ्यांच्या हाती असल्यामुळे वास्तविकतेची नोंद संबंधित कर्मचाऱ्यांनी ठेवणे किंवा ऑनलाईन प्रक्रिया करणाऱ्यांनी रजिस्टरला नोंद करून त्यासाठी वेगळा फॉर्मुला तयार करणे शक्य आहे. तातडीची मोजणी हा विषय तातडीचा असला तरी बराच वेळा त्याला विलंब होत आहे. यामध्ये नैसर्गिक आपत्ती याचबरोबर अधिकारी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे आणि वशिलेबाजी याचा चांगलाच पेव फुटलेला आहे. या अडचणीचे गुरु म्हणजे महा-ई- सेवा केंद्रातील सर्वर डाऊन होणे हा दुष्काळातील हमखास तेरावा महिना ठरलेला आहे.

माणसाने चंद्रावर पाऊल ठेवले पण मोजणे अभावी शेत जमिनीवर पाऊल ठेवणे कठीण झालेले आहे. यामुळे आता शेतकरी वर्ग चिंतेत आहे मूळ वारसदाराची इच्छा आहे की आपल्या डोळयासमोर प्रत्येक बहिण- भावंडांना जमीन वाटून दिले म्हणजे त्यांच्या भविष्यात वादीवाद होणार नाही. न्यायालयाची पायरी चढावी लागणार नाही. अशी अपेक्षा असते आणि ही अपेक्षा रास्त असली तरी भूमी अभिलेखा विभागाकडे मोजणीची प्रकरणे प्रलंबित होणे. हा एक कामकाजाचाच भाग झालेला आहे .

सातारा जिल्ह्यात वीस वर्षापूर्वी १०.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्र होते . ७.९९ लाख हेक्टर लागवडीसाठी उपयुक्त होते .सध्या कोयना, कुडाळी, उरमोडी, वसना, येरळा, ताराळी, कृष्णा नदीतील पाण्यावर प्रकल्प राबवल्यामुळे शेतजमीन ओलिताखाली येण्यासाठी खूप मदत झालेली आहे. आता शेत जमिनीला चांगलाच भाव आलेला आहे. त्याचबरोबर शहरीकरणही वाढले आहे . खुली जमीन त्याचे बाजार भावाचे दर व सरकारी दर आणि दलालांचे कमिशन असे सर्व मिळून सध्या जमिनीचे भाव हे सोन्यासारखे वाढत चाललेले आहे.

तालुकास्तरावर किती अर्ज प्राप्त झाले? किती तातडीची मोजणी झाली? किती मोजणी शिल्लक आहे? हे सांगण्याचे सौजन्य सुद्धा दाखवले जात नाही .अनेक निवेदन दिले जातात. प्रसारमाध्यमाकडे धाव घेतली जाते .पण ,शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले. वेळेत मोजणी झाली. असे कधीही प्रेस नोट काढून भूमी अभिलेखा कार्यालयाने आपल्या कामकाजाची मोजणी केलेली नाही.

## वाशिममध्ये डेंग्यू, चिकनगुनियाची साथ



● वाशिम, प्रतिनिधी :

मागील काही दिवसांपासून वातावरणात झालेला बदल, घरातील कुलरमधील साचलेले पाणी, सांडपाणी व इतर कारणामुळे जिल्ह्यात डेंगू, चिकनगुणीयाचा प्रादुर्भाव वाढला आहे. जानेवारी २०२४ ते आजपर्यंत जिल्ह्यात १६१ संशयीतांची जिल्हा हिवताप पथकाकडून तपासणी केली असता ३८ जणांना डेंग्यूची तर ३६ जणांना चिकनगुणीयाची लक्षणे आढळून आली आहेत. पावसाळा तोंडावर असल्यामुळे साथरोगांचा धोका घोंगावत असून नागरीकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून केले जात आहे.

डेंग्यू हा एक विषाणुजन्य आजार आहे. एडिस इजिप्ती डासांच्या चावल्यामुळे तो प्रसारित होतो. हा डास जवळपास ४०० मीटरपर्यंत उडू शकतो. हिवताप हा संसर्गजन्य असून एनोफिलीस जातीचा बाधीत मासा डास चावल्यामुळे त्यामध्ये असलेल्या प्लाजमोडियम परजीवीमुळे होतो. मागील काही दिवसांपासून कधी डक्ड ऊन तर कधी पाऊस अशी परिस्थिती असल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे घरा घरात कुलर लावलेले आहेत. मात्र त्यामधील पाणी बदलले जात नसल्यामुळे अशा पाण्यावर डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. परिणामी अनेक गावात डेंग्यू व चिकनगुणीयाचे रुग्ण आढळून येत आहेत. अशा रुग्णांची जिल्हा हिवताप विभागाकडून शोध मोहीम राबविली जात आहे.